श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ३ रें.] आश्विन शके १८४७ [ अंक ७ वा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


महाराजांचे अनुभव ... ... ... ... [illegible]

स्फुट विषय ... ... ... ... ... [illegible]

श्री साईसच्चरित ... ... ... ... [illegible]


## मासिकाच्या वर्गणीदारस विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत यांच्या चालकांचा हेतू याची छपाई व खर्चवेच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एखादे फंडास जमा व्हावें. असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या सेवा. मधून निदान एकतरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकंदरीनें कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रीतीनें मदत करणाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

यापुढें श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पडतील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतील व यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केलीं तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांचे नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

**गोविंद रघुनाथ दाभोळकर.**

श्रीसाईलीला ऑफिस ५ सेंट मार्टिन्सरोड, वांद्रें बी. बी. सी. आय. रेल्वे.

## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरनें अगाऊ रु.३।=व्ही. पी. नें रु. ३॥ चालू अंक -।= मागील अंक शिल्लक असल्यास -॥

पूर्वीच्या अंकात व्ही. पी. नें रु. ३॥= चुकून छापलें गेलें. असेंच यंदा ज्या कांहीं वर्गणीदाराकडे रु.३॥। ची व्ही.पी. चुकून गेली, त्यांचे -।- आमचेकडें जमा आहेत. अशा वर्गणीदारांनीं -।- परत मागितल्यास पाठवून देऊं.

शके १८४७ वैशाख व ज्येष्ठाचा जोड अंक नं. २-३ आणि आषाढचा अं. ४ यांत श्रीसाईबाबांच्या छापलेल्या फोटोच्या कांहीं प्रतीसाठीं मागणी आल्यावरून त्या प्रत्येक फोटोच्या १०० प्रती छापवून तयार आहेत. ज्या कोणास त्या संग्रहीं ठेवण्याची इच्छा असेल त्यानें प्रत्येक प्रतीसाठीं ८२ चीं तिकीटें व आपला पत्ता पाठवावा म्हणजे हे फोटो त्यांजला बु.पो.नें पाठविण्यांत येतील.

## सौ० चंद्राबाई आर. बोरकर, कुर्ला यांचेकडून आलेले त्यांचे अनुभव:—

मी कुर्डुवाडीस राहत असें. परंतु कोकिलाव्रत कारणानें कोपरगांव येथें जाऊन राहिलें होतें. नित्यनेमानें सकाळ संध्याकाळीं दत्ताच्या वाटावर प्रदक्षणा घालीत असतांना साईबाबांचा भास होत असे. एके दिवशीं गुरुवारीं " लसणाची चटणी व गुळाची भाकरी दे " असें म्हणत एक तरुण फकीर पुढें येऊन उभा राहिला. तेव्हां मी त्याला उत्तर दिलें कीं, मी कोकिलेचा शब्द ऐकण्याकरितां इकडे आलें आहें. आणि आम्हीं श्रावण महिन्यांत लसूण व कांदा खात नाहीं. परंतु ते विचार माझ्या मनांत घोळूं लागले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं नऊ वाजतां मी शिरडीचा रस्ता तात्काळ धरला व संध्याकाळीं चार वाजण्याच्या सुमारास शिर्डी येथें मी पोहोंचलें. काका साहेबांच्या वाड्यासमोर आल्यावर मला पंढरपूरचा भास झाला. तेथें एक मुलगा सुमारें अकरा वर्षांचा उभा होता; तो दीक्षितांचा बाबू होय. बाळ मला राधाकृष्णाचें घर दाखव असें मी त्याला सांगितलें, आणि मी त्यांच्या घरीं गेल्यावर त्यांना सांगितलें कीं, मला बाबांच्याकडे घेऊन चला. त्या म्हणाल्या मी मालकांच्याकडे जात नाहीं; त्यांनीं जोगांच्या ताईंना बोलावून आणिलें व त्या आणि मी मशिदींत दर्शनास गेलें. गेल्याबरोबर बाबांनीं तोंडांतून शब्द काढले कीं, " गुळाची भाकर आणि लसणाची चटणी दिली नाहींस आणि इकडे कशाला आलीस ? " हे शब्द कानीं पडतांच मी मनांत म्हटलें बाबा हे आपल्यास देण्यास आलें आहें. इतक्यांत जोगीणबाईंनीं सांगितलें ह्या आपलें दर्शन घेण्यास आल्या आहेत. मग बाबा म्हणाले ही माझी सात जन्माची बहन ( बहीण ) आहे. मी जिकडे जातों तिकडे ही अशीच शोधित येते. ते शब्द ऐकल्याबरोबर माझ्या डोळ्यांतून प्रेमनदी वाहूं लागली.

दुसऱ्या दिवशीं तेल्याची गाडी कोपरगांवाला जायची आहे तिच्यावर सामान आणून जोश्यांच्या घरीं रहा असें मला बाबांनीं सांगितलें.

आणि त्याप्रमाणें मी केलें. पुढें थोडया दिवसांनी जोश्यांचा मुलगा मॅट्रिक पास झाल्यावर ती मंडळी बाहेर गांवीं गेली. व दुसऱ्या एका भक्ताचें प्रयाण तेथें आलें. त्यांनीं माझें सामान पडवींत ठेवलें. तरीपण मी मनोनिग्रह केला कीं, बाबांच्या वचनाशिवाय कोठेंही जावयाचें नाहीं. त्या दिवशीं सर्वंच दिवस मी उपवासी राहिलें. दुसऱ्या दिवशीं बाबांनीं मला भूक लागली आहे बटाटयाची भाजी आणि भात कर असें सांगितलें. त्या दिवशीं काकासाहेबांच्याकडे नैवेद्य होता. काकासाहेबांनीं स्वतः मला जेवायला बोलाविलें परंतु बाबांच्या वचनाशिवाय मी कोणतीही गोष्ट करीत नाहीं असें मी त्यांना सांगितलें. आरती होऊन मंडळी गेल्यावर बाळा शिंप्याला बाबांनीं सांगितलें कीं ठकूताईला भात घेऊन येण्यास सांग. त्यानें सांगितल्यावरोबर मी भात आणि भाजी मशीदींत घेऊन गेलें. मोठया कौतुकानें बाबांनीं हांका मारून तूं जेवलीस काय असें विचारलें त्यावरोबर माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. मग बाबा उठून जेवण्यास बसले. जेवण झाल्यावर उदी घेऊन जाण्यास सांगितलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठ वाजतां बाबांनीं बाळा वाण्याला हांक मारली आणि त्याला सांगितलें आजच्या आज माझ्या बायला मशिदीसमोर खोली पाडून दे आणि त्यानें त्याप्रमाणें करून दिली. मग मी तेथें संध्याकाळीं वस्ती केली ती जागा अशी होती कीं त्याच खिडकींतून रोज सकाळीं बाबांचें दर्शन होत असे. पुढें कार्तिकी नवमीच्या दिवशीं मी स्नान करून सकाळीं आठ वाजतां बाबांच्या दर्शनास गेलें होतें. आपणच होऊन बाबांनीं म्हटलें कीं तुला येथें येऊन ३ महिने झाले तूं आतां पंढरपुरास जातेना? जा आतांच नीघ. टांगा कर आणि जा. मग मी त्यांना विचारलें बाबा आतां मला गाडी कशी मिळेल? सर्व कांहीं अल्ला वाली असें बाबा बोलल्यावरोबर उदी घेतली आणि मी पंढरपुरास जावयास निघालें. दहा वाजतां मी कोपरगांवास पोहोंचलें. तिकडे साने मामलेदारांच्या वडिलांनीं जेवावयास रहा असें मला सांगितलें.

तिकडे जेवण करून त्यांची मंडळी आणि मी अशी आह्मी पांच मंडळी मिळून स्टेशनवर आलों. मी तिकीट एकदम कुर्डुवाडीचें घेतलें आणि

मी सकाळीं सहा वाजतां कुर्डुवाडीला पोहोंचलें. तिकडे यात्रेची गर्दी फार होती तरी पण बाबांच्या कृपेनें मला सहा माणसांचे दुसऱ्या वर्गाचे पंढरपुरचे पास मिळाले. त्याचप्रमाणें दर्शनाचे पण सहा पास मिळाले. गुरूची कृपा असतांना आपणास काय उणें ? आनंदानें पांडुरंगाचें दर्शन घेऊन दोन दिवस पंढरपुरांत आनंदानें घालविले. व पंढरपूरहून कुर्डुवाडीला आलें.

कुर्डुवाडीला घरीं येऊन पाहतें तर काय चमत्कार ! नोकरीला एकवीस तासांचा राजीनामा देऊन मुंबईला गेले असें सर्व मंडळीनें सांगितल्याबरोबर मनाला दुःख फार झालें. आणि अश्रुधारा वाहूं लागल्या. तशीच चिंता करीत स्टेशनवर जाऊन बसलें. दौंडचें तिकीट काढलें होतें. स्टेशनवरच्या धर्मशाळेंत विचार करीत बसलें होतें. कृपाळू तो साई, त्यानें पूर्ण कृपा केल्यावरती दासाला काय उणें ? चिंता दूर होण्यास एक तास पण लागला नाहीं. एक फकीर दत्त ह्मणून उभा राहिला आणि म्हणाला वाय तुम्हाला कोठें जायचें आहे आणि कां रडतेस ? बाबा मी म्हणालें तुला सांगून तूं माझें काय करणार आहेस ?

तो फकीर अगदीं ल्हान होता. त्याचे शब्द व आवाज बाबांच्या सारखा होता त्यानें सांगितलें असें रडत बसूं नका. नाना साहेब सोहनी आपल्या घरीं नोकरी मागावयास जात आहेत आणि बोरकर साहेब दौंडला आले आहेत. मी धर्मशाळेंतून प्लॅट फार्मवर आलें न आलें तों नानासाहेब सोहनींनीं मला हांका मारून विचारलें कीं आपण दौंडला चालला कां ? मी होय म्हटल्यावर ते म्हणाले मी पण आपल्या येथें जात आहें कृपा करून माझ्या आईला तुमच्या जवळ बसऊन घ्या. पुढें गाडींत बसल्यावर त्यांनीं आमच्या घरची सर्व हकीकत सांगितली, ती अशीः—बोरकर साहेबांनीं जरी कुर्डुवाडीला राजीनामा दिला तरी तो मोठ्या साहेबांना पसंत पडला नाहीं आणि त्यांनीं दौंड बारामतीचें काम बोरकर साहेबांकडे दिलें. त्या कृपाळू साईची स्तुति मी दीन पामर काय करूं हें माझें पूर्व जन्माचें सुकृत होय. पुढें आमची गाडी दौंडला येऊन थडकली. संध्याकाळीं सहा वाजतां सर्व मंडळी घरीं सुखरूप पोंहोचली. आठ दिवस आनंदानें कालक्षेप केला. नंतर एके दिवशीं

रात्रीं मला स्वप्न पडलें तें असें :—साईबाबांनी स्वप्नांत येऊन सांगितलें दुर्गाबाईचे दोन पत्रे तूं शिर्डीला जाव ते, मी पहाटे स्वप्न सांगितलें तेव्हां आतां सहाव्या महिन्यांत तूं शिर्डीस जा असें सांगणें झालें. मला नाहीन परवान दिलें आणि मी शिर्डीस पोहोंचलें त्याच दिवशीं दुर्गाबाई त्यांच्याकडे चोरी झाली होती मशीदींत आल्यानंतर मी तेथें एक महिना सुखानें घालविला.

पुढें दोन वर्षांनी ओघु वर्षांत मी शिरडीत पुन्हा गेलें, पंधरा दिवस राहून बाबांची परवानगी घेण्यास गेलें त्यावेळीं बाबा मला म्हणाले गुरु पौर्णिमेनंतर जा. मग मी सेवा रहित करून तेथेंच राहिलें. गुरु पौर्णिमेचे दिवशीं मी पूजेचें सामान घेऊन मशिदींत गेलें. त्यावेळीं जो देखावा मी पाहिला तो मी जन्मभर विसरणार नाहीं. बाबांचें दर्शन घेणारांची नेहमीं गर्दी असावयाचीच. पण तो गुरुपौर्णिमेचा दिवस असल्यामुळें लोकांच्या भाविकपणास जणूं ऊतच आला होता. आषाढी एकादशीच्या दिवशीं पंढरपुरी जी महाद्वारांत गर्दी होते तिचीच तो देखावा आठवण करून देत होता. बाबा तर पांडुरंगासारखे दैवी व निराकार भासत होते हें सर्व पाहून मन फार प्रसन्न झालें व भक्तीनें कंठ दाटून आला.

पुढें पाऊस फार पडूं लागल्यामुळें मला शिरडी सोडणें अनेक कारणास्तव अनिष्ट वाटलें व थोडे दिवस शिर्डीसच मुक्काम केला. पावसाचा पहिला जोर ओसरल्यावर मी निरोप घेण्यासाठीं बाबांकडे गेलें व बरोबर चांगली सोबत असल्यामुळें घरीं जाण्याची इच्छा आहे तर जाण्यास परवानगी द्यावी अशी विनंति केली. तेव्हां बाबा म्हणाले, "तुला सोबत कशाला पाहिजे ? तूं जाऊं नको." तेव्हां मी स्वस्थ राहिलें. तो दिवस आषाढांतील अमावास्येचा म्हणजे दिव्यांच्या अमावास्येचा होता त्या रात्रीं मी घरीं एकटीच निजलें होतें. रात्रीं एक दोन वाजायच्या सुमारास भिंत फोडून चोर आंत घुसले. त्यांच्या हातांत लखलखीत सुऱ्या होत्या. भीतीनें गाळण उडाल्यामुळें तोंडांतून शब्द निघेना मी असहाय स्थितींत त्यांच्याकडे पहात पडलें होतें. पंधरा एक मिनिटांत किंमतीची चटसारी चीजवस्त घेऊन ते मला कांहीं एक

अपाय न करतां निघून गेले. तेव्हां मी मनांत म्हटलें साई तारी त्याला कोण मारी ? सकाळीं पांच वाजेतोंपासून बाबा आक्रोश करूं लागले कीं चोरी झाली. सकाळीं उजाडल्यावर मी मशिदीकडे निघालें. बाबांच्यापुढें जाऊन मी रडत उभी राहिलें. तेव्हां बाबांनी पुसलें बाय काय झालें ? मी म्हटलें आपल्याला सर्व कांहीं माहित आहे. तेव्हां ते येवढेंच बोलले 'अल्ला वाली आहे' नंतर पोलीस पार्टी येऊन तपास करूं लागली तेव्हां मी त्यांना सांगितलें माझी कांहीं चोरी झाली नाहीं. देणारा देतो आणि घेणारा घेतो साई देणारा असला म्हणजे दासाला काय उणें ? त्यावेळीं मी घरची सासुरवाशिण असल्यामुळें काय होईल अन् काय नाहीं याची मनाला फार हुरहुर लागून राहिली होती. तो प्रकार जरी वरीं समजला होता तरी सद्गुरुकृपेनें कांहीं एक जाच झाला नाहीं. त्या सद्गुरुचे मी दीन पामर कोण्याप्रकारें आभार मानूं ?

चाल— ( हजरत सलाम घ्यावा )

साई प्रणाम घ्यावा । कृपाप्रेम वर्षवीं देवा ॥ ध्रु० ॥
प्रेमरसाचा निर्झर साचा । तूंची असशि मज साई देवा ॥ १ ॥
सद्गुरुचरणीं भाव जयाचा । मोक्ष त्यासि ठरलासा देवा ॥ २ ॥
माय तूंचि जणुं पिता जनांचा । तुझी दासि मज तारीं देवा ॥ ३ ॥
कृपादृष्टि तव असे मजवरी । भीति मला कोणाची देवा ॥ ४ ॥
चरितामृति तव चित्त रमतसे । ताई करित तव धांवा देवा ॥ ५ ॥

## श्रीसाईनाथ प्रसन्न.

" आपुलिया बळें नाहीं बोलवत सखा कृपावंत वाचा त्याची; × × × × काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें, परि त्या विश्वंभरें बोलविलें."

" सत्पुरूष नश्वर देहाचा त्याग करून गेले असतांना त्यांच्या अविनाशी अस्तित्वाचा प्रत्यय पदोपदीं येत असतो. आणि ते आपल्या कल्याणाकरितां अविश्रांत झटत असतात अशी खात्री पटते. फक्त त्यांच्या ठिकाणची आपली निष्ठा अथवा श्रद्धा अढळ व दृढ पाहिजे."

दरवर्षाच्या माझ्या नियमाला अनुसरून मी गेल्या गुरूपौर्णिमेस शिरडीला जाण्याकरितां निघालों. नगरहून कांहीं मंडळी माझ्या बरोबर शिरडीस येणार असें मला त्यांनीं अगाऊ कळविल्यामुळें मी एकदोन दिवस अगोदर नगरास गेलों. माझ्याबरोबर रा. रा. बापुसाहेब शिरसाठे यांच्या कुटुंबांतील सर्व मंडळीचा येण्याचा संकल्प होता परंतु त्यांपैकीं कांहीं मंडळी पुण्यास होती व कांहीं नगरांत होती. आणि नगरांतील मंडळींना वेळीच सूचना देण्याच्या हेतूनें मी नगरास थोडासा अगोदर गेलों होतों. माझ्या जाण्यानें तिथल्या मंडळींना अत्यानंद होऊन ती निघण्याला फारच उत्सुक झाली. बापुसाहेबांचा नातू दत्तोबा तुळशीराम चव्हाण हा बराच भाविक मुलगा आहे व त्याची सांईनाथ बाबांवर पूर्ण श्रद्धा आहे. शिरडीला जाण्याचे दिवशीं पैशासंबंधानें त्याला फार अडचण होती पण एकवेळ ज्याच्याकडे त्याचे पैसे यावयाचे होते त्या गृहस्थानें आपण होऊन त्याला बोलावून त्याचे पैसे दिले त्यामुळें त्याची बाबांच्यावरही निष्ठा जवळ जवळ वज्रलेप झाली म्हणावयास हरकत नाहीं.आणि याच निष्ठेच्या अपूर्व सामर्थ्यावर त्यानें आपल्या नातेवाईक व स्नेह्यांच्या मनांत निष्ठेचें बीजारोपण केलें.

रामचंद्र विठोबा थोरात हा सदर दत्तूचा स्नेही व नातेवाईक होय. दत्तू शिरडीस जाणार हें ऐकून त्याच्या मनांत बरीच अस्वस्थता उत्पन्न झाली. रामचंद्र हा एकटा नगरास शिकण्यास आहे आणि त्याचे पालक म्हणजे वडील बंधु व मातुश्री ही मंडळी तळेगांवास असल्याकारणानें.

स्वाभाविकच त्याच्या जाण्याच्या खर्चाची सोय होणें शक्य नव्हतें. आणि विशेष दुःखाची गोष्ट म्हणजे समान शीलानुरूप आपला जोडीदार दत्तू शिरडीस जाणार म्हणून त्याला अत्यंत वाईट वाटूं लागलें. रामचंद्राच्यानें राहवेना म्हणून त्यानें दत्तूचा सल्ला विचारला. नगरहून निघण्याच्या आदल्या दिवशी ही एकमेकां स्नेह्यांची सुखदुःखाची विचारपूस चालली होती. दत्तूनें आपल्या स्वानुभवावरून रामचंद्रास छातीठोकपणानें असें सांगितलें कीं तूं साईनाथ बाबांवर पूर्ण हवाला व विश्वास ठेव. खात्रीनें त्यांची मेहेर झाल्यास ते तुला शिरडीला घेऊन जातील. असें म्हणून त्यानें त्याला उदी लावली. निघण्याची वेळ जसजशी जवळ येऊं लागली तसतशी रामचंद्राची उदासीनता जास्तच वाढूं लागली. पण चमत्कार असा कीं निघण्याच्या पूर्वी थोडाचवेळ तळेगांवाहून रामचंद्राची मातुश्री न बोलावतांच व न कळवितां अचूक तेथें दाखल झाली व बाईनीं आपल्या मुलाला आपल्याबरोबर शिरडीस नेलें. हा झालेला प्रकार त्या मुलानें म्हणजे रामचंद्रानें मला साद्यंत निवेदन केला तो आपल्यापुढें मांडला आहे.

गणपतराव शिंदे नांवाचे दुसरे एक गृहस्थ ज्यांचा आमच्याबरोबर शिरडीस येण्याचा कृतसंकल्पच होता पण निघण्याच्या पूर्वीच्या आठवडाभर त्यांना नित्य संध्याकाळीं हिंव येत असे त्यामुळें त्यांचा येण्याचा निश्चय थोडासा डळमळूं लागला पण मी त्यांना प्रोत्साहन दिल्यानंतर व बाबांच्या ठिकाणीं निष्ठा दृढ ठेवल्यास कांहीं अडचण येणार नाहीं सर्व ठीक होईल. या वाक्यावर विश्वास ठेऊन त्यांनीं दुसऱ्या दिवशीं संध्याकाळपर्यंत हिंवाची वाट पाहिली पण आलें नाहीं ह्यावरून ते तावडतोब शिरडीस निघून आले. तेथें थंड पाण्याचें स्नान व इतर अपथ्य झालें परंतु त्याच्या या निष्ठारूपी हेमगर्भाच्या मात्रेनें हिंवास काळ्याचा आपला गाशा गुंडाळावा लागला.

रा. रा. बापुसाहेबांचा मनोदय सर्व कुटुंबासह शिरडीस जावें असा होता. आणि या त्यांच्या हेतूप्रमाणें सर्व मंडळींची आणि विशेषतः कांहीं त्यांच्या अधिकारी मुलांनीं आपली जरूरीची कामें बाजूस ठेऊन मुष्किलीनें रजा मिळवून बरोबर जाण्याचा योग साधला. परंतु त्यांच्या और किसमच्या

एका चिरंजिवानीं आपल्या वडिलांच्या या देवभोळ्या विचाराला कांहींच महत्व दिलें नाहीं व ह्याशें खांवट या नात्यानें आपल्यास अत्यंत जरूरीचें काम आहे या सबबीवर सर्वांना नाराज करण्याचें श्रेय घेतलें. त्यांना वाटत होतें कीं आपण आपल्या मंडळीची कांहींतरी समजूत घालून निष्कारण त्रास व खर्च वांचविला. पण मनुष्यप्राण्याला अतर्क्य व अगम्य अशी कांहीं शक्ति आहे याची त्यांना कल्पना नसावी किंवा असल्यास तिचें तेवढ्या वेळेपुरतें त्यांना विस्मरण झालें असावें खास. आणि स्वाभाविकच अशा स्थितींत 'घी देखा पण बडगा नहि देखा' या म्हणीचें विस्मरण होणें संभवनीय आहे.

त्यांचें कुटुंब नगरास असे. आणि आपल्या कामाचे सवडीप्रमाणें ते नगरास जात येत असत. त्यांच्या कुटुंबाला नगराहून शिरडीस नेण्याकरितां जो इसम पाठविला होता त्याला तेथें फुलें खरेदी करण्याचें काम होतें म्हणून त्यानें बाईंना तिकीट काढून गाडींत बसवून त्यांना जरूर व योग्य अशा सूचना देऊन कोपरगांवास जावयास सांगितलें. तेथें मंडळी भेटतील आणि तेथून पुढें मंडळीबरोबर जावें असा हेतू. कर्मधर्मसंयोगानें मधल्या एका स्टेशनावर बाईंच्या पतिदेवाची आकस्मित गांठ पडली आणि विचारपूस केल्यानंतर आपल्या कुटुंबानें एकटेंच जाणें त्यांना इष्ट न वाटून त्या उभयतांनीं आपला मोर्चा कोपरगांवाकडे वळविला. आणि त्यांच्या सुदैवानें मंडळींची गाठ न पडल्यामुळें रखडत मोठ्या कष्टानें स्पेशल टांग्यानें स्वाऱ्या शिरडी मुक्कामीं दाखल झाल्या. म्हणजे जे गृहस्थ शिरडीस येण्यास पूर्ण नाखुष व अत्यंत दुराग्रही त्यांनासुद्धां येणें भाग पडलें, आणि यांतच सिद्धांच्या अथवा सत्पुरुषांच्या ठिकाणचें वैशिष्ट्य व्यक्त होत आहे.

सदर बापुसाहेबांच्या लहान मुलीला बरेच दिवस झाले ताप येत असे पण मुलीनें त्या संबंधानें कोणा जवळही न काढला नव्हता आणि नगरास मुलीचा ताप पाहिल्याबरोबर बापुसाहेब थोडेसे घाबरले. पण मी त्यांना घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं असें सांगितलें. कारण बाबांच्या लीला

अगाध आहेत त्यांच्या ठिकाणी निष्ठा दृढ असूं द्या म्हणजे झालें. नंतर त्या मुलीला मी बाबांच्या तीर्थांतून उदी दिली. आणि उदी पोटांत गेल्यानंतरचा विद्युत् चमत्कार म्हणजे मुलीला ताप येत होता म्हणणें अश्रद्धेय वाटूं लागलें. आणि यांत विशेष असें कांहींच नाहीं. अवलियाच्या लीला अशा चमत्कृतिजनक असावयाच्याच फक्त त्यांच्यावर आपली दृढ निष्ठा व पूर्ण भरंवसा पाहिजे.

मला स्वतःला तेथें गेल्यावर प्रवासाच्या दगदगीमुळें किंवा मार्गावरील अन्नामुळें एकाएकीं पाण्यासारखे झाडे होण्याला सुरवात झाली. मला वाटूं लागलें कीं बाबा आपल्या कृपेनें पायांजवळ तर येऊन पोहोंचलों. परंतु या त्रासाचें पित्तुल मागें कां? कदाचित् माझ्या भावनेंत तर फरक झाला नसेल ना? झाडयानीं अगदीं बेजार झालों. माझी ही असहाय स्थिति पाहून सर्व मंडळींची गाळण उडाली म्हणण्यापेक्षां त्यांच्या तोंडचें पाणी पळालें म्हटल्यास अस्थानीं होणार नाहीं. नंतर शेवटची हेमगर्भाची मात्रा अथवा रामबाण उपाय म्हणजे बाबांना सांकडें घालणें, या निश्चयानें बाबांच्या समाधीजवळ गेलों व माझें सर्व संकट त्यांना घातलें आणि मनोभावानें त्यांच्या पायांचें तीर्थ व उदी घेतली. नंतरचा चमत्कार म्हणजे या दिव्य तीर्थ उदीच्या साह्यानें एकदम आळण बसलें. आणि आस्ते आस्ते दुसरे दिवशीं सकाळपर्यंत अगदीं साफ बरें वाटलें म्हणजे सर्व त्रास नाहींसा झाला.

विशेष अचंबा वाटण्यासारखा एक प्रकार म्हणजे माझ्याबरोबर आलेल्या पुण्याच्या एका गृहस्थानीं दूरदर्शिपणानें निघतांना आपल्याबरोबर डिटज त्यांटर्न पेटवून घेतला होता कारण ते तेथून रात्रीच्या गाडीनें निघाले गाडींत बसल्यानंतर कंदील विझाल्यावर त्यांच्या नोकराच्या हलगर्जीपणामुळें अथवा धांदलीमुळें त्यांतलें कांहीं तेल गाडींत सांडलें नंतर शिरडी मुक्कामी तो कांहींसा दिवसासारखा रात्रभर जळत होता. मालकाची कल्पना अशी झाली कीं नोकर कोठून तरी तेल भरीत असेल पण तपासा-

अंतीं असें कळलें की नोकर तेल न भरतां नुसता त्यास साफ करून कंदील रोज लावीत असे. पुण्यांत तेल भरलेलें त्याच्यांतून डब्यांत सांडलेलें अशा स्थितींत कंदील ५ रात्री सतत पेटत राहिला हा मोठाच अचंबा आहे व हें गूढ कोडें उलगडणें जवळ जवळ अशक्य आहे.बाबांची मेहेर झाल्यास त्यांना कांहींही अशक्य नाहीं. जो कंदील पूर्ण भरला असतां रात्रीं नियमित वेळ असा कटाकटीनें जास्तींत जास्ती दोन दिवस जळूं शकतो तोच कंदील उपरिनिर्दिष्ट स्थितींत ५ रात्री जळूं शकला हें महदाश्चर्य नव्हे काय ?

शेवटीं इतकेंच सांगावयाचें कीं त्यांची मेहेर झाल्यास अखिल विश्वांत अशक्य असें त्यांना कांहीं आहे काय ? फक्त आपली निष्ठा अचल, श्रद्धा अखंड व भावना शुद्ध असली म्हणजे क्षणोक्षणीं त्या अद्भुत व अपूर्व शक्तीचा प्रत्यय अथवा जाणीव आल्यावांचून रहाणार नाहीं. फक्त गुरुपौर्णिमेच्या दौऱ्यांत चमत्कृतिजनक असे घडलेले व अनुभवलेले प्रसंग नमूद केले आहेत त्यांच्यापासून जो बोध घेतां येण्यासारखा असेल तो ज्याचा त्यानें घ्यावा.

बाबांचा एकनिष्ठ सेवक, अहर्निश सेवालोलुप

**शंकर काशिनाथ दुबे.**

## संस्थान शिर्डी येथील शके १८४७ ची गुरुपौर्णिमा.

दरवर्षीप्रमाणें यंदाचा गुरूपौर्णिमेचा उत्सव, समारंभास आलेल्या भक्त मंडळींनी भक्तीनें व थाटानें साजरा केला.

महाराजांनी समाधि घेतल्यानंतर वार्षिक उत्सवांची जी व्यवस्था झाली त्यांत श्री. बापुसाहेब बुटी यांनी हा उत्सव साजरा करण्याची जबाबदारी आपलेकडे घेतली व आपले हयातींत ती पूर्णपणें पार पाडली. १९२१ साली बापुसाहेब वारल्यानंतर तीच जबाबदारी त्यांच्या चरंजिवांनी घेतली व त्या वेळेपासून उत्सव त्यांचेकडून साजरा होत आहे. गेली दोन वर्षे हा उत्सव श्रीमंत बुटी बंधूंच्या विनंतीवरून त्यांचे वतीनें संस्थान कमिटीनें साजरा केला व तत्प्रीत्यर्थ दर उत्सवास रु. ५०० प्रमाणें श्रीमंत बुटीबंधू यांनी संस्थान कमिटीस दिले. श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध केलेल्या गुरुपौर्णिमेच्या उत्सवाच्या हिशोबावरून दिसून येईल कीं शके १८४५ साली उत्सवाप्रीत्यर्थ श्रींच्या पेटींत रु. १२४॥-। दक्षिणेच्या रूपानें मिळाले व किरकोळ वर्गणीचे रु. २६५।=। मिळाले या दोन रकमा व श्रीमंत बुटीकडून आलेले रु. ५०० मिळून उत्सवाप्रीत्यर्थ एकंदर रु. ८८९॥=॥ जमा झाले. पैकीं उत्सवाप्रीत्यर्थ रु. ४५६॥-। खर्च होऊन, रु. ४३३।-। शिलकींत पडले. त्याचप्रमाणें गतवर्षी श्रीमंत बुटीचे रु. ५०० व वर्गणी रु. ३४२॥।=व पेटींतील जमा रु. ७३॥≡॥ मिळून रु. ९१६॥-॥ जमा झाले व खर्च रु. ४६२।-॥ होऊन रु. ४५४॥ शिलकींत पडले. या तऱ्हेच्या शिलकीच्या रकमा संस्थान कमेटीच्या ठरावाप्रमाणें संस्थानच्या कायम फंडांत पुढें दर्ग करण्यांत आल्या.

संस्थानचा कायमफंड वाढविणें किती जरूरीचें आहे हें नव्यानें सांगण्यास नको. त्या दिशेनें इतर प्रयत्नही चालू आहेत. यंदा उत्सवास आलेल्या कांहीं मंडळींनीं लहान लहान देणग्या कायमफंडाकडे देण्याचा एक नवा उपक्रम सुरु केला. अर्थात् ही रक्कम फारशी नाहीं परंतु थेंबें थेंबें तळें साचे या म्हणीप्रमाणें असल्या लहान लहान रकमा मिळून त्यांतूनच एक मोठी

रक्कम होईल व उत्सवांतून राहिलेली शिल्लक व अशा तऱ्हेनें आलेल्या लहान लहान रकमा मिळून कालांतरानें कायम फंडाला चांगलीच मदत होईल.

कालगतीनें वडिलांच्या निधनाचें दुःख ओसरून यंदा श्री. बुटीबंधूंनी हा उत्सव संस्थान कमेटीकडून पुन्हा आपले हातीं घेतला यावद्दल आम्हांस फार आनंद होत आहे. गेलीं दोन वर्षें जरी उत्सव संस्थान कमिटीकडून होत होता तरी श्री. पूर्णचंद्रभैय्या हे स्वतः उत्सवाला हजर राहिले होते. व त्याप्रमाणें यंदाही ते आले होते. त्यांचे वडील बंधू श्री. केशवराव भैय्या हेही महाराजांचे परम भक्त आहेत. महाराज देहधारी असतांना त्यांना महाराजांचा अनुग्रह झालेला आहे. या उत्सवप्रसंगीं श्री. पूर्णचंद्र भैय्यांना एकटें न पाठवितां त्यांनींही येऊन उत्सव साजरा करीत जावा व त्यायोगें इतर भक्तमंडळीबरोबर परिचय कायम ठेवावा अशी आमची त्यांना आग्रहाची विनंति आहे.

यंदाच्या उत्सवाला आलेल्या भक्तमंडळीचें प्रमाण थोडेसें निराशाजनक होतें. आज कित्येक वर्षें अव्याहतपणें येत असलेली बरीच भक्तमंडळी यंदा आली नाहीं.

पुण्याचे रा. काशीनाथ शंकर डुबे आपल्या वळगांतील मंडळीसह जर आले नसते तर बाकी राहिलेले भक्त बोटावर मोजतां आले असते. रा. काशीनाथपंत मामाबरोबर बायकांमुलांसह २०-२५ मंडळी आल्यामुळें बरीच बाजू राखली गेली. त्यांच्या मंडळींत, त्यांचे चिरंजीव रंगनाथपंत, अहमद नगरचे बापुराव सदाशीव शिरसाठे, त्यांचे दोन्हीं चिरंजीव डॉ. हरी बापुराव शिरसाठे ( धुळें ), रा. सदाशीव बापुराव शिरसाठे, नगरचे गणपत तुकाराम शिंदे व मारुतीराव महादबा फंड, पुण्याचे रामचंद्र सदोबा मालुसरे एकनाथ प्रल्हाद सुगांवकर, शंकर गणपत शिंदे, माळीमंडळी, गोदूबाई भ्रतार विठ्ठलराव थोरात तळेगांव ढमढेरें ही मंडळी बायकांमुलांसह आली होती. मुंबईकडील रा. काकासाहेब दीक्षित रा. अण्णासाहेब दाभोळकर, रा. भडकमकर वकील रा. रघुवीर भास्कर पुरंदरे, रा. हरीभाऊ चौबळ रा. काकासाहेब महाजनी. रा. वासुदेवराव साठे रा. रामभाऊ खानोलकर,

रा. वसंतराव पोतदार, बळवंतराव कर्णीक, रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर हाय कोर्ट वकील, मनमाडचे रा. कोठांगडे—खांडव्याचे पुरुषोत्तमराव, व बाळासाहेब रेगे वकील, नाशीकचे भाऊसाहेब धुमाळ वकील, अशी मंडळी आली होती.

ता.५-७-२५ रोजीं तिसरे प्रहरीं संस्थानच्या कमेटीची सभा रा. बाळासाहेब महाजनी यांच्या अध्यक्षत्वाखालीं झाली. त्यावेळीं संस्थानचा वार्षिक रिपोर्ट आणि जमाखर्चाचा आढावा सभेंत सादर होऊन एकमतानें मंजूर झाला. रिपोर्ट व आढावा गेल्या श्रावणाचे अंकांत प्रसिद्ध केला आहे.

संस्थानच्या सर्व व्यवस्थेवर देखरेख ठेवण्याकरितां या वर्षापासून संस्थान कमिटीनें एका पगारी कामदाराची नेमणूक केली आहे. आजपर्यंत शिर्डी येथील संस्थानचे देखरेखीचें काम दुय्यम चिटणीस रा. रामचंद्र दादा कोते पाटील हे स्वतः पहात असत. रा. रामचंद्र पाटलानीं सर्वस्वी आज याला संस्थानला वाहून घेऊन हें काम किती उत्तम तऱ्हेनें चालविलें याची जाणीव सर्व साई-भक्तांना पूर्णपणें आहेच. रामचंद्र पाटलांचे आजे रा. आऊ कोते पाटील हे कैलासवासी झाल्यामुळें त्यांच्यावर प्रपंचाचा बोजा येऊन पडला व आतां त्यांना पूर्वीप्रमाणें संस्थानला आपला सर्व वेळ देणें अशक्य झालें. या कारणास्तव संस्थान कमेटीला ही योजना करणें भाग पडलें. अर्थात रामचंद्र पाटील हे दुय्यम चिटणीस कायम आहेतच व त्यांचा संस्थानला पूर्ण पाठिंबा आहे. तूर्त या नवीन जागेवर शिर्डी येथील पेन्शनर हेड मास्तर रा. दाजी वामन चिदंबर यांची नेमणूक केली आहे. शिर्डीस दर्शनास येणाऱ्या मंडळीना सर्वतोपरी मदत करण्याचें काम यांचेकडे सोंपविलें आहे.

ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणें सर्व उत्सव व्यवस्थित पार पडला. कीर्तनाची अडचण पडेल असें वाटत होतें. कीर्तनकार पौर्णिमेपर्यंत कोणी आले नाहीत. त्यामुळें कार्यक्रमांतील हा भाग गाळावा लागेल म्हणून काळजी वाटत होती. परंतु महाराज आपल्या भक्तांना काळजीमुक्त करणारे समर्थ असल्यामुळें कीर्तनाचा योग अचानक जमून आला. खांडव्याचे बाळासाहेब रेगे यांना कांहीं विशेष अडचणीमुळें पौर्णिमेला येतां आलें नाहीं तरी

सवड करून प्रतिपदेच्या एक दिवसाकरितां ते आले व त्यांनी नेहेमीप्रमाणें सुश्राव्य कीर्तन करून बाजू राखली. श्री समर्थ रामदास स्वामींचें आख्यान लावलें होतें, व तें इतकें सरस वठलें की श्रोतृवृंद पूर्ण तल्लीन झाला होता.

पौर्णिमेला समाधीवर एक लघुरुद्र व इतर भक्तांची आवर्तनें झाली. हे अभिषेक सुमारें ११ वाजतां संपले. नंतर सर्व भक्तांनी सुस्वर वाद्यांच्या गजरांत समाधीला पंचामृत मंगलस्नान घातलें. पुढें भक्तमंडळीच्या पूजा सुरू झाल्या. सर्वांनीं निरनिराळ्या तऱ्हेची रंगीबेरंगी वस्त्रें, पुष्पहार, फुलांच्या चादरी वगैरे समाधीवर घातल्या. समाधीवरती एक सुंदर फुलांची चादर लोंबती बांधली. एकंदर देखावा फारच मनोहर दिसत होता. सर्व मंदिरांत पुष्प परिमल भरून राहिला होता. पूजा संपल्यानंतर थाटानें वाद्यांच्या गजरांत आरती झाली. आरतीनंतर काशिनाथ मामा डुबे यांच्या मंडळीचें थोडेसें भजन होऊन तीर्थप्रसाद वांटण्यांत आला.

दोन प्रहरीं नवलकरांच्या वाड्यांत थाटाचा भोजन समारंभ झाला. पंक्तीचा बेत उत्तम झाला होता. भोजनानंतर काकासाहेबांचे वाड्यांत भक्तमंडळाची सभा श्रीमंत पूर्णचंद्र भय्या यांचे अध्यक्षतेखालीं झाली. कमिटीचा वार्षिक अहवाल व जमाखर्चाचा आढावा एकमतानें मंजूर झाला.

रात्री ९ वाजतां थाटांत रथाची मिरवणूक निघाली. ती आंखलेल्या मार्गानें जाऊन ठराविक ठिकाणीं थांबून शिरस्त्याप्रमाणें तेथें भजन, लळीत गारुड वगैरे होऊन उत्तर रात्रीं समाधिमंदिरांत परत आली. नंतर शेजारती होऊन, मंडळी आपआपल्या स्थानीं विश्रांतीकरितां गेली.

प्रतिपदेला गोरगरिबांस अन्नसंतर्पण झालें. सुमारें दीड हजार पात्र झालें असेल. तिसऱ्या प्रहरीं बाळासाहेब रेगे यांचें कीर्तन झालें. द्वितीयेला रात्रीं पालखीची मिरवणूक काढून पालखी चावडींत नेली. व तेथें श्रींची आरती झाली. तृतीयेला सकाळीं गोपाळकाला झाला. काल्याचें कीर्तन गतवर्षीप्रमाणें रा. बाप्पाजी लक्ष्मण कुळकर्णी यांनीं केलें. कीर्तन चांगलें झालें. नंतर दहीहंडी फुटून उत्सवसमाप्ति झाली.

## एका साईभक्तानें पाठविलेली कविता.

## श्री साईमल्लिनाथ समर्थ.

शिरडि ग्रामिं संत हाचि साई जाहला ॥
अज्ञानासि नासुनियां अचल कसा ठेला ॥
भवबंधरहित असा कल्पतरुचि आला ॥
नास्तिकांसि सुपथ कसा यांनीं दाविला ॥
सीमा तव उपकारा वर्णूं मी किती॥
विठ्ठलसुत वर्णितांचि गुंगली मती ॥
उतार दिसती म्हणुनि बाबा, म्हणतो म्हातारा ॥
तसा नव्हे हो अमुचा बाबा, खचितचि महा तारा ॥
यांनि तारिले मूढ जनांना म्हणुनि हा तारा ॥
या ताऱ्याचें दर्शन होतां तरशिल पर पारा॥
साई, साई, तुला साई कां म्हणावें ॥
सा म्हणतां साक्षित्वें, ईशरुप व्हावें ॥ साई ॥
जगपाला तूं साई, न्याय देसि ठायीं ठायीं ॥
असुनि तुझा दास कसा, तळमळतो या ठायीं ॥ साई ॥
बा साई, करि करुणा, उद्धरि तूं या दीना ॥
हीच असे विनति तुला, हे दयाघना ॥
साई-साई-साई,

## ॥ स्नेहपत्रिका ॥

रा. रा. पी. जी. पाटील ( हरेराम ) यांनीं श्री हरि सीताराम दीक्षित-संबंधें त्यांस श्री साईबाबांच्या कृपेनें सुचलेली कविता त्यांजकडे पाठविली ती.

का? का? काका हांका मारिती तुज बाबा बहु प्रेमानें ॥
विभ्रांत मती अती सोडुनि देई जणु खुणविती वचनें ॥ १ ॥
नलगे कष्ट ते स्पष्ट सांगती सुष्टजन मधुर गानानें ॥
तूंचि मजशीं हरी दिसशी भजसी दारुण नेमानें ॥ २ ॥
कन्हयालाल गोपाल संवगडी कर आपुलासा भावानें ॥
योगयाग ते करणें नलगे गेल्या भक्तीमार्गानें ॥ ३ ॥
बहिरिंद्रियें बंद करी बा पाही आंतिल नेत्रानें ॥
सहज समाधी तुमची लागे बाबा कृपादृष्टीनें ॥ ४ ॥

क्षणभरी तरी शांती घेई विषय होतिल मग साने ॥
तेंचि असे गा सार अर्जुना कथियेलें भगवत्कृष्णें ॥ ५ ॥
अनन्य चेताः सततं यो मां स्मरतो नित्य नेमानें ॥
तस्य सुलभ अहं पार्थ इति कथितो अति करुणा वचनें ॥ ६ ॥
गुरुवाक्य हें उमजुनि घेई उधळीं हर्षे गा सुमनें ॥
लावी अक्षतामिश्रित केशर चंदन उटी कीं सुमनें ॥ ७ ॥
परमात्म्याचें सुलभ वाक्य हें परी कठिण वा तें नेणें ॥
दास आपुला लागे चरणीं हेंचि करीं गा तव लेणें ॥ ८ ॥

आपला दास.

" श्री साईलीलेच्या शके १८४७ च्या आषाढच्या अंकांतील फोटोस पाहून. "

पद (चालः—ये धांवत कृष्णा०)

बघतांच तुझ्या या शांत भव्य चित्राला ।
आनंद होत नेत्रांला ।
प्रत्यक्ष धरावे वाटे तव चरणाला ।
परि गमे अशक्य मनाला
किति सौम्य रूप दिसे परि या काला ।
नच दर्शन दुर्भाग्याला ।
साक्षात दिससि भक्तांस एकनिष्ठांला ।
तूं देसी अभय तयांला ॥ १ ॥
भो साईनाथ " अनाथा " घे पदरांत ।
तारी या भवदुःखांत ।
तव कीर्ति विमल परिसुनी ऐकशिल मात ।
म्हणुनियां जोडितों हात ।
घे मान्य करुनि विनतीस, पुरवि मम हेत ।
बघुं नकोस माझा अंत ॥ २ ॥
स्वत्पदीं ठेवण्या भाला शरण रिघाला ।
घेउनी काव्य कलिकेला ।
तव कृपाप्रसादें फुलवी प्रारब्धाला ।
नच कठिण तुला करण्याला ।
घे करुनि गोड सेवेला शिवदासाला ।
आणि लावी सन्मार्गाला ॥ ३ ॥

ले० शिवदास, मुखेडकर. नांदेड (निजाम)

## शिर्डीहून रा. रा. माधवराव देशपांडे यांचे श्री. हरि सीताराम दीक्षित यांस ता. १५।११।१९१० रोजीं आलेलें पत्र.

चरणसेवेशीं. कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना तागायत मजकूर पात्रेतों.

श्री समर्थांचे कृपेंकरून इकडील सर्व ल्हान थोर मंडळी सुरक्षीत असो. श्री समर्थ शरीरानें खुशाल आहेत. श्री समर्थांचा हात आतां जळलेला चांगला होत चालला आहे. हल्लीं कोरडे पडले आहेत. दररोज आनंदांत असतात. आपलें पत्र काल रोजीं वाचून दाखवून नमस्कार सांगितला व सदाशिवराव यांचे कुटुंबाबद्दल कळविलें. परंतु श्री समर्थ म्हणूं लागले कीं सर्व प्रभूचे खेळ आहेत. तोच निवारण करणार आहे. आपण कशाकरितां काळजी करावी ? अशीं भाषणें काढलीं होतीं.इकडे दहा,बारा दिवसांपासून चौरी, अबदागीर, मोर्चेल वगैरे श्रीसमर्थ चावडींत जाण्याचे वेळेस व आरतीचे वेळेस धरूं देतात व चोपदार आरोळ्या मारितात. इतके नवें काम वाढलें आहे. लोकांची फार गर्दी होते. आपलेकडून बाळाजी आनंदराव आज रोजीं श्री समर्थांचे दर्शनास आले आहेत. सडकेवर महाराज परसाकडेस गेले होते; तेव्हां हे दर्शनाकरितां उतरले. पायांत कांटा मोडला होता तो कांटा इतका कठीण मोडला कीं तळपायांत शिरून वर निघाला. वाड्यांत आल्याबरोबर काढला. दुखापत सद्गुरुच्या कृपेनें अगदीं झाली नाहीं. तात्यासाहेब नूलकर यांनीं साठे साहेब यांजला बाबांचे परवानगीवरून जागा बांधण्याबद्दल पत्र पाठविलें होतें. तात्याकडूनही परवानगी मिळाली. उद्यां अगर परवां जागा बांधण्याचें काम सुरूं करणार आहे. हवा पाणी चांगली आहे. कळावें हे विज्ञापना.

साईदास

माधव बळवंत देशपांडे

## बाबांचे बोल

ते. श्री० हरि सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षितांबरोबर बोलत असतां मुखांतून निघालेले:-

पिढयानुपिढयांचीं दु:खें आहेत.आजचीं नाहींत.माझ्यावर ओझें फार झालें. जीव लई कंटाळला. तेली वगैरे वाडा बांधीत असत. संध्याकाळपर्यंत काम करावयाचें व रात्रीं सगळें जमीनदोस्त व्हावयाचें. वलीनें पाहिलें. जमीन पाहिली. मेथीची भाजी लावली. मेथीवर वाडा बांधिला. तो राहिला. चार माणसें मेलीं पण वाडा राहिला.कल्याण होईल.पिढीन पिढी कल्याण होईल.

कशाला भितोस ?

### श्रीयुत " श्री सांईलीला " मासिककर्ते यांसः—

सप्रेम सा. न. वि. वि. शके १८४० मिति आश्विन शु. १० रोजीं " श्रीसमर्थ संत सांईबाबा " हे समाधिस्त झाले हें अशुभ आणि मनास उदासीनता आणणारें वर्तमान ऐकून, एक चालता बोलता सगुणरूपधारी परमात्मा आपणाला सोडून गुप्त झाला असें वाटलें आणि अंत:करणास अतिशय दु:ख झालें ! त्यावेळीं ते दु:खोद्गार कवितारूपानें लिहून जवळ संग्रहार्थ ठेविले होते. आपण श्री सांईमहाराजासंबंधाचें वाङ्मय प्रसिद्ध करीत असलेलें पाहून ती दु:खोद्गाराची कविता यासोबत पाठविली जात आहे. तरी कृपा करून या कवितेस आपल्या मासिक पुस्तकांत स्थळ देऊन सांईसेवेंत आपणाबरोबर मलाही भागीदार कराल ही आशा बाळगणारा-

संतदास.

श्रावण व. २ शके. १८४७ " दत्तकिंकर-कंधारकर-नांदेड.

( निजाम स्टेट )

# अध्याय ३३ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरूसाईनाथाय नमः ॥

आतां नमूं संतसज्जन । होतां जयांचें कृपावलोकन ॥
तात्काळ पातकपर्वत दहन । कलिमलक्षालन रोकडें ॥ १ ॥
जयांच्या उपकारांच्या राशी । फिटती न जन्मजन्मांतरासीं ॥
सहज बोलणें हितोपदेशी । परम अविनाशी सुखदाई ॥ २ ॥
हें अपुलें हें परावें । नाहीं जयांचे चित्तास ठावें ॥
भेदभावावृत संसृतिचे उठावे । मनीं नुमटावे जयांचे ॥ ३ ॥
पूर्वील अध्यायीं जाहलें श्रवण । गुरु गरिमेचें अंशनिरूपण ॥
आतां ये अध्यायीं श्रोतेजन । परिसा कीं महिमान उदीचें ॥ ४ ॥
मागमागोनि दक्षिणा घेत । दीना दुबळ्यांस धर्म करीत ॥
उरल्यांच्या मोळ्या खरीदीत । ढीग रिचवीत काष्ठांचे ॥ ५ ॥
तयां शुष्क काष्ठांमत । सन्मुख धुनीमाजी होमित ॥
तयांची राख होई जी अमित । उदी ती ओपित भक्तांस ॥ ६ ॥
शिरडीहूनि गांवीं परततां । बाबांपाशीं रजा मागतां ॥
उदी देण्याचा परिपाठ होता । ठावें हें समस्तां भक्तांस ॥ ७ ॥
किंबहुना आणा उदी म्हणतां । खरी अनुज्ञा झाली आतां ॥
म्हणोन ज्याचे त्याचे चित्ता । परताया उल्हासता वाटतसे ॥ ८ ॥

तैसेंच शिरडींत वास्तव्य असतां । माध्यान्हीं आणि सायंकालः ॥
बाबा कोणासही उदी न देतां । रिक्तहस्ता पाठवीत ॥ ९ ॥
हाच प्रत्यही होता क्रम । परि त्या उदीचा काय धर्म ॥
मशीदींत धुनी कां अविश्रम । कां हा उपक्रम नित्याचा ॥ १० ॥
विभूतीदानीं मनोगत । बाबा काय सुचवीत ॥
हें दृश्य सकळ विश्वांतर्गत । राख हें निश्चित मनिं उमजा ॥ ११ ॥
देहही पंचभूतांचें काष्ठ । भोगभोगावया अवशिष्ट ॥
भोग सरतां पडेल निचेष्ट । होईल विस्पष्ट ही राख ॥ १२ ॥
तुमची माझी हीच स्थिति । तियेची तुम्हांस व्हावी स्मृती ॥
अहर्निश मजही जागृती । तदर्थ विभूती देतसें ॥ १३ ॥
अखिल विश्व माया विजृंभित । ब्रह्म सत्य ब्रह्मांड अनृत ॥
याची खूण ही उदी सत्य । निश्चितार्थ हा माना ॥ १४ ॥
येथें नाहीं कोणी कुणाचें ।दारा, पुत्र, मामे, भाचे ॥
नग्न आलों नग्न जायाचें । उदीही याचें स्मारक ॥ १५ ॥
उदीचें या केलिया चर्चन । आधि व्याधी होती निरसन ॥
परी या उदीचा तत्वार्थ गहन । विवेकपूर्ण वैराग्य ॥ १६ ॥
देववेल ती देऊनि दक्षिणा । साधाया प्रवृत्ति वैराग्यलक्षणा ॥
पुढें मग निवृत्ति वैराग्य खुणा । कळतील आपणां हळू हळू ॥ १७ ॥
आलें जरी वैराग्य हातीं । विवेक जरी नाहीं संगतीं ॥
तरी तयाची होईल माती । म्हणून विभूती आदरा ॥ १८ ॥
विवेक वैराग्याची जोड । तीच ही विभूती दक्षिणेची सांगड ॥
बांधिल्यावीण भवनदीची थड । अति अवघड गांठावया ॥ १९ ॥
लहान थोर दर्शना येत । चरणीं बाबांचे होऊनि विनत ॥
जेव्हां जेव्हां माघारां जात । विभूती देत त्यां बाबा ॥ २० ॥

मशीदींत नित्याची धुनी । अक्षयी प्रदीप्त निशिदिनीं ॥
त्यांतील मूठमूठ रक्षा देउनी ॥ बाबा बोळवणी करीत ॥ २१ ॥
प्रसाद म्हणून रक्षा देत । निजांगुष्ठें निडळा फांसित ॥
सर्वांचि तो हस्त शिरीं ठेवित । कल्याण इच्छित भक्तांचें ॥ २२ ॥
रक्षा विभूती आणि उदी । शब्द तीन परी एकार्थवादी ॥
हाची प्रसाद नित्य निरवधी । बाबा अबाधीत वांटीत ॥ २३ ॥
संसार आहे उदीसमान । हें एक या उदीचें महिमान ॥
येईल ऐसा एक दिन । मनीं आठवण ही ठेवा ॥ २४ ॥
कमल-दल-जलसमान । नश्वर हा देह होईल पतन ॥
म्हणूनि याचा त्यागा अभिमान । उदी प्रदान हें दावी ॥ २५ ॥
सकळ विश्वाचा हा पसारा । रांगोळीसम निर्धारा ॥
करा जगन्मिथ्यत्व विचारा सत्यत्वा धारा उदींत ॥ २६ ॥
उदी म्हणजे केवळ माती । नामरूपाची अंतिम गती ॥
वाचारंभण विकार जगतीं ।-मृत्तिके प्रतीती सत्यत्वें ॥ २७ ॥
स्वयें बाबाही प्रेमांत येतां । ऐकिले आहेत गाणें गातां ॥
त्यांतील चुटका उदीपुरता । परिसिजे श्रोतां सादरता ॥ २८ ॥
"रमते राम आयोजी आयोजी । उदियांकी गोनियां लायोजी" ॥धृ॥
लागतां मनाची लहर । होऊनियां हर्षनिर्भर ॥
इतुकेंच धृपद वरचेवर । अति सुस्वर म्हणत ते ॥ २९ ॥
सारांश, ही बाबांची धुनी ॥ प्रसवली कितीक उदीच्या गोणी ॥
नाहीं गणाया समर्थ कोणी ॥ परम कल्याणी ही उदी ॥ ३० ॥
परिसोनि उदीदान गुह्यार्थ । तैसाच परमार्थ आणि भावार्थ ॥
पुसती श्रोते शुद्ध स्वार्थ । योगक्षेमार्थ उदीचा ॥ ३१ ॥
उदीपोटीं हाही गुण । महती कैसी वाढेल यावीण ॥
साई परमार्थ मार्गीचा धुरीण । स्वार्थ साधून परमार्थ दे ॥ ३२ ॥

या उदीच्या योगक्षेमकथा । सांगूं येतील असंख्याता ॥
परी त्या कथितों अति संकलिता । ग्रंथविस्तारता टाळाव्या ॥ ३३ ॥
एकदां नारायण मोतीराम । जानी हें ज्यांचें उपनाम ॥
ब्राह्मण औदीच गृहस्थाश्रम । वसतीचें स्थळ नाशीक ॥ ३४ ॥
तैसेच बाबांचे आणीक भक्त । नामें रामचंद्र वामन मोडक ॥
हे नारायणराव तयांचे सेवक । भक्त भावीक बाबांचे ॥ ३५ ॥
सवें घेऊन मातोश्रींतें । बाबा जें देहधारी होते ॥
नारायणराव जाहले जाते । दर्शनातें बाबांच्या ॥ ३६ ॥
तेव्हांच आपण होऊन तीतें । बाबांनीं आधींच सुचविलें होतें ॥
आतां न येथून सेवाधर्मातें । राहिला अमुतें संबंध ॥ ३७ ॥
पुरे ही ताबेदारी आतां । स्वतंत्र धंदा बरवा यापरता ॥
पुढें मग अल्पकाल जातां । दया भगवंता उपजली ॥ ३८ ॥
सुटली नोकरी पराधीनता । आवडू लागली स्वतंत्रता ॥
भोजन, वसती गृहव्यवस्था । स्थापिली स्वसत्ता तेथेंच ॥ ३९ ॥
नाम ठेविलें आनंदाश्रम । त्यांतची केले परिश्रम ॥
दिवसेंदिवस वाढलें नाम । जाहला आराम चित्ताला ॥ ४० ॥
पाहूनि ऐसी वार्ता घडली । निष्ठा सांईपदीं वाढली ॥
ती मग दृढभक्तीस्वरूपा चढली ॥ अनुभवें ठसली अढळता ॥ ४१॥
प्रत्यया आली साईची वाणी । श्रवणार्थियां जाहली काहणी ॥
प्रेम वाढलें साईचरणीं ॥ अघटित करणी सांईची ॥ ४२ ॥
बोलणें अवघें प्रथम पुरुषीं । परी तें नित्य दुजियाविशीं ॥
लक्ष ठेवूनि देखणारासी ॥ अहर्निशीं प्रत्यय हा ॥ ४३ ॥
पुढें जैसा जैसा अनुभव । वाढलें भक्तिप्रेमवैभव ॥
आणखी एक तयांचा अभिनव । भक्तिभाव परिसावा ॥ ४४ ॥

असो एकदां एक दिवस । नारायणरावांचे मित्रास ॥
जाहला एकाकीं वृश्चिकदंश । वेदनाविवश बहु झाला ॥ ४५ ॥
लावावया दंशाचे जागीं । बाबांची उदी फार उपयोगी ॥
परी जातां शोधावयालागीं । लाधेना मागी तियेची ॥ ४६ ॥
स्नेह्यास सोसवती न वेदना ॥ उदीचा कांहीं शोध लागेना ॥
घेऊनि बाबांच्या छबीच्या दर्शना ॥ भाकिली करुणा बाबांना ॥४७॥
मग तेथेंच त्या छबीचे तळीं । जळत्या उदबत्तीची कोजळी ॥
होती पडलेली रक्षा ते स्थळीं । उदीच भाविली क्षणभरी ॥ ४८ ॥
घेऊनि त्यांतील एक चिमटी । दंश जाहल्या जागीं फांसटी ॥
मुखें साईनाम मंत्र पुटपुटी । भावनेपोटीं अनुभव ॥ ४९ ॥
ऐकतां वाटेल नवल मोटें । रक्षा चोळितां क्षणींच बोटें ॥
* वेदना पळाल्या आलिया वाटे । प्रेम दाटे उभयांसी ॥ ५० ॥

---

१ पत्ता. २ फांसी.

* असेच बाबतींत रा. रा. हरि सीताराम दीक्षित यांनीं लिहून ठेवलेले अनुभव:—

एकदां बापुसाहेब जोगांना विंचू चावला. त्यावेळेला सुमारें रात्रीचे आठ वाजले होते. ते तावडतोब महाराजांकडे गेले. पायरी चढत असतांनाच महाराज म्हणाले, "बापुसाहेब काय आहे." बापुसाहेब म्हणाले "बाबा मला विंचू चावला" महाराज म्हणाले " बरें होईल जा " बापुसाहेब तसेच पायरीवरून परत फिरले. ते कंपौंडचे बाहेर गेले नाहींत तोंच वेदना अजिबात बंद झाल्या.

---

शिर्डीस एक कर्णपिशाच्य साध्य करून घेतलेले ज्योतिषीबुवा गेले होते. ते महाराजांचे दर्शनाला गेले पण त्यांचें लक्ष पैशाकडे बरेंच होतें. तेथें त्यांना पैसे मिळण्याचा फारसा संभव वाटला नाहीं म्हणून ते दर्शन घेऊन लवकरच राहण्यास गेले. तेथें रात्रीं त्यांना विंचू चावला फार वेदना होऊं लागल्या तेव्हां त्यांनी महाराजांनीं दिलेली उदी लावली व एकसारखें

ही तरी उदबत्तीची विभूती । व्यथिताप्रती लाविली होती ॥
परी उदी म्हणून मार्गींची माती । ऐसीच अनुभूती प्रकटिते ॥ ५१ ॥
मातीपरी तियेचा संसर्ग । जयास झालें दुखणें वा रोग ॥
तयावीण इतरांवरी प्रयोग । करितांही उपयोग घडतसे ॥ ५२ ॥
एकदां एका भक्ताची दुहिता । ग्रंथिज्वरें घेरली ही वार्ता ॥
ग्रामांतराहूनि येतां अवचिता । उद्भवली चिंता पितयास ॥ ५३ ॥
पिता वांद्रेशहरवासी । मुलगी अन्य ग्रामीं रहिवासी ॥
उदीचा संग्रह नाहीं पाशीं । निरोप नानाशीं पाठविला ॥ ५४ ॥
करावी आपण बाबांची प्रार्थना । दूर करावी माझी विवंचना ॥
म्हणून प्रार्थिलें चांदोरकरांना । उदी धाडाना प्रासादीक ॥ ५५ ॥
निरोप घेऊन जाणारियास । नानाही भेटले मार्गास ॥
जात होते कल्याणास । कुटुंबासमवेत ते समयीं ॥ ५६ ॥
ठाणें शहरीं स्टेशनापाशीं । निरोप पावला हा नानाशीं ॥
उदी पाहतां नाहीं हाताशीं । उचलिलें मृत्तिकेसी मार्गींच्या ॥ ५७ ॥
तेथेंच उभें राहूनि रस्तां । गाऱ्हाणें घालूनि साईसमर्थां ॥
मागें वळूनि स्वस्त्रीचे माथां । चिमुट तत्वतां लाविली ॥ ५८ ॥
येरीकडे तो भक्त निघाला । मुलगी होती त्या गांवीं पातला ॥
तेथें तयास जो वृत्तांत कळला । ऐकून सुखावला अत्यंत ॥ ५९ ॥
मुलगीस तीन दिवस ज्वर । आला होता अत्यंत प्रखर ॥
वेदनांनीं जाहली जर्जर । कालचि तिळभर आराम ॥ ६० ॥

---

महाराजांचें नामस्मरण चालूं केलें. त्यामुळें वेदना थांबल्या व त्यांची महाराजांवर श्रद्धा बसली. दुसरे दिवशीं जोशीबुवा परत शिर्डीस गेले. तेथें त्यांचें पंधरा वीस दिवस राहणें झालें व महाराजांचे कृपेनें त्यांना तेथें जवळजवळ तीनशें रुपये मिळाले.

१ कै. वा. नारायणगोविंद चांदोरकरांस. २ रस्त्यांत.

पाहूं जातां तीच ती वेळा । उदी आऊनि भूतिकेचा गिळा ॥
करूनि नानांहीं जैं साई गान्हाणिला । उतार पडला तेथूनि ॥ ६१ ॥
असो त्या दुखण्याची ही कथा । योग्य प्रसंगीं सविस्तरता ॥
पुढें मागें येईल कथितां । उदी प्रस्ताव चुटका हा ६२ ॥
हेंच प्रेमळ चांदोरकर । असतां जामनेरीं मामलतदार ॥
साई निजभक्त कल्याणैक तत्पर । करीत चमत्कार तो परिसा ॥६३॥
उदीचा या महिमा अपार । श्रोतां होईजे श्रवण तत्पर ॥
कथितों दुजा तो चमत्कार । आश्चर्य थोर वाटेल ॥ ६४ ॥
आसन्नप्रसव नानांची दुहिता । असह्य चालल्या प्रसूतिव्यथा ॥
जामनेराहून साई समर्था ॥ हांका सर्वथा मारिती ॥ ६५ ॥
जामनेरींची ही स्थिती । शिरडीस कोणास ठावी नव्हती ॥
बाबा सर्वज्ञ सर्वगती । कांहीं न जगतीं अज्ञात त्यां ॥ ६६ ॥
बाबांसीं भक्तांची एकात्मता । जाणून नानांचे एथील अवस्था ॥
समर्थ सांई द्रवले चित्ता । करिती तत्वतां तें काय ॥ ६७ ॥
उदी धाडावी आलें जीवा । इतुक्यांत गोसावी रामगीरबुवा ॥
जाहला तयाच्या मनाचा उठावा । आपुलें गांवा गमनार्थी ॥ ६८ ॥
गांव तयाचा खानदेशीं । निघाला सर्व तयारीनिशीं ॥
पातला बाबांचे पायापाशीं । दर्शनासी मशीदी ॥ ६९ ॥
बाबा देहधारी असतां । आधी तयांचे पायां न पडतां ॥
कोणीही कवण्याही कार्यानिमित्ता । अनुज्ञा न घेतां जाईना ॥ ७० ॥
असो लग्न वा मौंजीबंधन । मंगल कार्य विधि विधान ॥
कार्य कारण वा प्रयोजन । लागे अनुमोदन बाबांचे ॥ ७१ ॥
विना तयांचे पूर्ण अनुज्ञापन । उदी प्रसाद आशिर्वचन ॥
होणार नाहीं कार्य निर्विघ्न । भावना पूर्ण सकळांची ॥ ७२ ॥

असो ऐशी त्या गांवीं रीत । तदनुरोधें रामगीर येत ॥
पायांस बाबांचे लागत । अनुज्ञा मागत निघावया ॥ ७३ ॥
म्हणे बाबा खानदेशीं । येतों जाउनियां गांवासी ॥
द्या कीं उदी आशिर्वाद मजसी । अनुज्ञा दासासी निघावया ॥ ७४ ॥
जयास बाबा प्रेम भावा । बाहती बापूगीर या नांवा ॥
म्हणती जाई खुशाल तूं गांवा । मार्गीं विसांवा घे थोडा ॥ ७५ ॥
आधीं जाई जामनेरा । उतर तेथें नानाच्या घरा ॥
घेऊनी तयाच्या समाचारा । मग तूं पुढारा मार्ग धरीं ॥ ७६ ॥
म्हणती माधवराव देशपांड्याप्रती । उतरून दे रे कागदावरती ॥
शामा ती अडकराची आरती । गोसाव्या हातीं नानातें ॥ ७७
मग गोसाविया उदी देती । आणिक थोडी पुडींत बांधिती ॥
पुडी देऊन त्याचे हातीं । बाबा पाठविती नानास ॥७८
वदती ही पुडी आणि ही आरती । नेऊनि देई नानाप्रती ॥
पुसूनि क्षेम कुशल स्थिती । निघे पुढतीं निज गांवा ॥ ७९ ॥
जैसी रामाजनार्दन कृती । " आरती ज्ञानराजा " ही आरती ॥
तैसीच "आरती सांईबाबा " निश्चिती । समान स्थिती उभयांची॥८०॥
रामाजनार्दन जनार्दन भक्त । माधव अडकर साई पदांकित ॥
रचना प्रसादपूर्ण अत्यंत । भजन तद्गहीत अपूर्ण ॥ ८१ ॥
असो ही बाबांची आवडती । श्रोतां परिसिजे साद्यंत आरती ॥
उदीसमवेत बाबाजी पाठविती ॥ पुढें फलश्रुती दिसेल ॥ ८२ ॥

## आरती

आरती सांईबाबा । सौख्यदातारजीवा । चरणरजातळीं ।
निज दासां विसावा । भक्तां विसावा ॥ आ० ॥

जाळुनियां अनंग । स्वस्वरूपीं राहे दंग । मुमुक्षु जनां दावी ॥
निज डोळां श्रीरंग । डोळा श्रीरंग ॥ आ० ॥
जया मनीं जैसा भाव । तया तैसा अनुभव । दाविसि दयाघना ॥
ऐसी तुझी ही माव । तुझी ही माव ॥ आ० ॥
तुमचें नाम ध्यातां । हरे संसृतिव्यथा । अगाध तव करणी ॥
मार्ग दावी अनाथा । दावी अनाथा ॥ आ० ॥
कलियुगीं अवतार । सगुण ब्रह्म साचार । अवतीर्ण झालासे ।
स्वामी दत्त दिगंबर । दत्तदिगंबर ॥ आ० ॥
आठां दिवसां गुरुवारीं । भक्त करिती वारी । प्रभुपद पहावया ।
भवभय निवारी । भय निवारी ॥ आ० ॥
माझा निज द्रव्यठेवा । तव चरणरजसेवा । मागणें हेचि असे ।
तुम्हां देवाधिदेवा । देवाधिदेवा ॥ आ० ॥
इच्छित दीन चातक । निर्मळ तोय निजसुख । पाजावें माधवा ।
संभाळ आपुली ही भाक । आपुली ही भाक ॥ आ० ॥
गोसावी वदे बाबालागून । मजपाशीं अवघे रुपये दोन ॥
इतुके न केवी मीं पोहचेन । बाबा जाऊन जामनेरीं ॥ ८३ ॥
बाबा वदती तूं स्वस्थ जाई । लागेल तुझी सर्व सोयी ॥
विश्वास ठेवूनि साईचे पायीं । निघाले गोसावी जावया ॥ ८४ ॥
आज्ञा वंदूनि बापूगीर । घेऊनि ऐसा बाबांचा विचार ॥
उदीप्रसाद पावूनि सत्वर । कार्यतत्पर निघाला ॥ ८५ ॥
जामनेरास जैसा आतां । नव्हता तेव्हां अग्निरथाचा रस्ता ॥
नव्हती प्रवासाची सुलभता । उपजली चिंता गोसाविया ॥ ८६ ॥
बैसूनिया अग्निरथांत । प्रवासी उतरले जळगांवांत ॥
तेथून पुढील मार्ग समस्त । जावें लागत पादचारी ॥ ८७ ॥

एक रुपया चवदा आणे । भरलें अग्निरथाचें देणें ॥
उरलें अवघें चवकीचें नाणें । कैसेनि जाणें पुढारा ॥ ८८ ॥
ऐसा गोसावी चिंतातूर । असतां जळगांव स्टेशनावर ॥
टिकीट देऊन पडे जों बाहेर । शिपाई दूर देखिला ॥ ८९ ॥
शिपाई आधींच शोधावर । येऊनिया उताव्हसमोर ॥
पुसे शिर्डीचा बापूगीर । तो कोण साचार कथा हो ॥ ९० ॥
तें त्या शिपायाचें पुसणें । जाणूनि केवळ आपुल्या कारणें ॥
गोसावी पुढें होऊनि म्हणे । मीच तो म्हणणें काय कीं ॥ ९१ ॥
तो म्हणे मज तुम्हालागूनि । पाठविलेंसे चांदोरकरानीं ॥
चला सत्वर टांग्यांत बैसूनि । राहिले पाहुनी मार्ग तुमचा ॥ ९२ ॥
बुवास अत्यंत आनंद झाला । नानास शिर्डीहून निरोप गेला ॥
तरींच हा वेळेवर टांगा आला । घोरची चुकला हा मोठा ॥ ९३ ॥
शिपाई दिसला मोठा चतूर । दाढी मिशा कल्लेदार ॥
नीट नेटस ल्यालेला इजार । तांगाही सुंदर देखिला ॥ ९४ ॥
जैसा तांगा तैसेच घोडे । ते काय होते भाड्याचे थोडे ? ॥
निघतीं इतर तांग्यांचे पुढें । उत्साह ओढें[1] कार्याच्या ॥ ९५ ॥
भरतां द्वादश घटकानिशी । सुटला तांगा जो वेगेसी ॥
थांबविला तो पहाटेसीं । ओढियापाशीं वाटेंत ॥ ९६ ॥
तंव तो तांगेवाला सोडी । पाणी पाजावया आपुलीं घोडीं ॥
म्हणे आतांच येतों तातडी । करूं सुख परवडी फराळ ॥ ९७ ॥
पाणी घेऊनि येतों थोडें । खाऊं आपण आंबे पेढे ॥
आणीक गुळपापडीचे तुकडे । जुंपूनि घोडे निघूं मग ॥ ९८ ॥
दाढी पेहराव मुसलमानी । परिसूनि ऐसी तयाची वाणी ॥
होय साशंकित रामगीर मनीं ॥ फराळ हा कोणी करावा ॥ ९९ ॥

[1] ओढ्यानें.

म्हणोनि तयास विचारी जात ॥ म्हणे तूं कां झालासी शंकित ॥
मी हिंदू गरवाल क्षत्रिय पूत । असें मी रजपूत जातीचा ॥ १०० ॥
फराळही हा नाना देती । तुझियालागीं मज संगती ॥
शंका नको यत्किंचित निश्चिती । स्वस्थ चित्तीं सेवी हा ॥ १०१ ॥
ऐसा जेव्हां विश्वास पटला । मग त्या दोघांनीं फराळ केला ॥
टांगेवाल्यानें टांगा जोडिला । प्रवास संपला अरुणोदयीं ॥ १०२ ॥
टांगा प्रवेशतां गांवाभीतरीं । दिसूं लागली नानाची कचेरी ॥
घोडेही विसवले क्षणभरीं । सुखावे अंतरीं रामगीर ॥ १०३ ॥
बुवास दाटली लघुशंका । बसाया गेले बाजूस एका ॥
पूर्वस्थळीं परतती जों का । आश्चर्य देखा वर्तलें ॥ १०४ ॥
नाहीं टांगा, नाहीं घोडीं । दिसेना टांगेवाला गडी ॥
कोणीही तेथें न दिसे ते घडी । जागा उघडी देखिली ॥ १०५ ॥
रामगीर मनीं विचारी । चमत्कार हा काय तरी ॥
आणोनिया मज येथवरीं । इतुक्यांत दूरी गेला कुठें ॥ १०६ ॥
बुवा जावोनी कचेरी आंत । नानांची भेट घ्यावया उत्कंठित ॥
असती निजगृहीं हें कळतां वृत्त । जावया तें प्रवृत्त जाहला ॥१०७॥
बुवा वाटेनें पुसत चालला । सहज नानाचा पत्ता लागला ॥
ओटीवर जों जाऊन बैसला । आंत बोलाविला नानांहीं ॥ १०८ ॥
परस्परांची भेट जाहली । उदी आरती बाहेर काढिली ॥
नानांचिया सन्मुख ठेविली । वार्ता निवेदिली संपूर्ण ॥ १०९ ॥
नवल ही जंव उदी आली । मुलगी नानांची त्याच कालीं ॥
प्रसूत्यर्थ होती अडली । जाहलेली अती कष्टी ॥ ११० ॥
व्हावया तें संकटनिरसन । मांडिलें होतें नवचंडी हवन ॥
पाहूनि सप्तशती पाठपठण । विस्मयापन्न गोसावी ॥ १११ ॥
जैसें क्षुधार्ता अकल्पित । ताट यावें पक्वान्नपूरित ॥
किंवा तृषित चकोरा मुखीं अमृत । तैसें तंव होत नानांला ॥ ११२ ॥

हांक मारिली कुटुंबाला । उदी दिधली पाजावयाला ॥
स्वयें आरती म्हणावयाला । आरंभ केला नानांहीं ॥ ११३ ॥
वेळ क्षणभर गेला न गेला । बाहेर आंतूनि निरोप आला ॥
ओठास लावितां उदीचा प्याला । आराम पडला मुलगीस ॥ ११४ ॥
तात्काळ क्लेशनिर्मुक्ती जाहली । मुलगी निर्विघ्न प्रसूत पावली ॥
सुखानें हाती पायीं सुटली । काळजी फिटली सर्वांची ॥ ११५ ॥
टांगेवाला कुठें गेला । येथेंही मज नाहीं आढळला ॥
रामगीर पुसे नानांला । टांगा धाडिला तो कुठें ॥ ११६ ॥
नाना वदती म्यां न धाडिला । टांगा कुठला ठावा न मजला ॥
तुम्ही येतां हें ठावें कुणाला । टांगा कशाला धाडीन मी ॥ ११७ ॥
मग बुवांनीं टांग्याची कथा । आमूलाग्र कथिली समस्तां ॥
विस्मय दाटला नानांचे चित्ता । पाहूनि वत्सलता बावांची ॥ ११८ ॥
कुठला टांगा, कुठला शिपाई । नट नाटकी ही माउली साई ॥
संकटसमयीं धांवत येई । भावा पायीं भक्तांच्या ॥ ११९ ॥
असो; आतां कथानुसंधान । पुढें चालवूं पूर्वील कथन ॥
पुढें कांहीं कालांतरें करून । बाबाही निर्वाण पावले ॥ १२० ॥
सन एकूणीसशें अठरा । विजयादशमी सण दसरा ॥
पाहोनि बाबांनीं हा शुभदिन बरा । केला धरार्पण निजदेह ॥ १२१ ॥
मग पुढें जाहली समाधी । नारायणराव तया आधीं ॥
बाबा देहधारी तधीं । दर्शन साधी दों वेळां ॥ १२२ ॥
समाधीस झाले तीन संवत्सर । दर्शनेच्छा जरीं बलवत्तर ॥
परी येतां येईना योग्य अवसर । तेणें अधीर जाहले ॥ १२३ ॥
समाधीमागें वर्ष भरलें । नारायणराव व्याधींनीं पीडिले ॥
औषधोपचार सर्व सरले । उपाय हरले लौकीकी ॥ १२४ ॥
गेले जरी व्याधीनें गांजून । रात्रंदिन बाबांचें ध्यान ॥
गुरुरायास कैचें मरण । दिधलें दर्शन नारायणा ॥ १२५ ॥

एके रात्रीं पडलें स्वप्न । साई एका भुयारामधून ॥
नारायणरावांपाशीं येऊन । देती आश्वासन तयांतें ॥ १२६ ॥
काळजी कांहीं न धरी मनीं । उतार पडेल उद्यांपासुनी ॥
एक आठवडा संपतां क्षणीं । बसशील उठूनी तूं स्वयें ॥ १२७ ॥
असो; मग आठ दिवस लोटले । अक्षरेंअक्षर प्रत्यंतर आलें ॥
नारायणराव उठून बैसले । अंतरीं धाले अनिवार ॥ १२८ ॥
ऐसेच कांहीं जातां दिवस । आले नारायणराव शिर्डीस ॥
समाधीचे दर्शनास । तेव्हां या अनुभवास कथियेलें ॥ १२९ ॥
देहधारी म्हणूनि जित । समाधिस्थ जे ते काय मृत ॥
साई जननमरणातीत । सदा अनुस्यूत स्थिरचरीं ॥ १३० ॥
वन्ही जैसा काष्ठीं गुप्त । दिसेना परी तदंतर्हित ॥
घर्षण प्रयोगें होई प्रदीप्त । तैसाच भक्तार्थ हा साई ॥१३१ ॥
एकदां जो प्रेमें देखिला । तयाचा आजन्म अंकित झाला ॥
केवळ अनन्य प्रेमाचा भुकेला । तयाच्या हाकेला ओ देई ॥ १३२ ॥
न लगे तयांसी स्थळ वा काळ । उभा निरंतर सर्व काळ ॥
कैसी कोठून दावील कळ । करणी अकळ तयाची ॥ १३३ ॥
ऐसी कांहीं करील रचना । मनांत येतील कुतर्क नाना ॥
तों तों दृष्टी ठेवितां चरणां । ध्यानधारणा वाढेल ॥ १३४ ॥
ऐसें झालिया एकाग्र मन । घडेल अत्यंत साईचिंतन ॥
हेंच हा साई घेई करवून । कार्यही निर्विघ्न पार पडे ॥ १३५ ॥
व्यवहार नलगे सोडावयास । सुटेल आपोआप हव्यास ॥
ऐसा हा मनां लावितां अभ्यास । कार्यही अप्रयास घडेल ॥१३६ ॥
कर्मभूमीस आलासे देह । कर्मे घडतील निःसंदेह ॥
स्त्री, पुत्र, वित्त आणि गेह । यथेच्छ परिग्रह होवो का ॥ १३७ ॥
होणार तें होउंद्या यथेष्ट । सद्गुरुचिंतन आपलें अभीष्ट ॥
संकल्प विकल्प होतील नष्ट । संचित अनिष्ट टळेल ॥ १३८ ॥

पाहोनिया भक्तभाव । कैसे साई महानुभाव ॥
दावीत भक्तांस एकेक अनुभव । वाढवित वैभव भक्तीचें ॥ १३९ ॥
वाटेल तैसा वेष घेती । मानेल तेथें प्रकट होती ॥
भक्तकल्याणार्थ कुठेंही फिरती । शिष्यभावार्थी पाहिजे ॥ १४० ॥
ये अर्थीची अणिक कथा । श्रोतां परिसिजे सादर चित्ता ॥
संत आपुल्या भक्तां करितां । कैसे श्रमतात अहर्निश ॥ १४१ ॥
खोलूनिया कानांची कवाडें । हृदयमंदिर कराकीं उघडें ॥
रिघूं द्या ईसं आंतुलीकडे । भवभय सांकडें वारील ॥ १४२ ॥
हें जें सांप्रत सरलें प्रसिद्ध । शार्मण्य देशींयाशीं युद्ध ॥
लष्कर करूं लागे सिद्ध । शत्रूविरुद्ध संग्रामा ॥ १४३ ॥
आंग्लभौम राज्याधिकारी । या भरतभूमीचिया भीतरीं ॥
लष्करभरती शहरोशहरीं । होते करीत चोहींकडे ॥ १४४ ॥
सन एकोणीसशें सतरा सालीं । एका भक्ताची वेळ आली ॥
ठाणें जिल्ह्यास नेमणूक झाली । कथा वर्तली नवल परी ॥ १४५ ॥
आपासाहेब कुळकर्णी नांव । जडला साईचरणीं भाव ॥
हा तरी एक साईचा प्रभाव । लीला अथांव तयाची ॥ १४६ ॥
तयांतें बहुतां वर्षांपूर्वीं । बाळासाहेब भाटयांकरवीं ॥
प्राप्त जाहली बाबांची छवी । होती लाविली पूजेस ॥ १४७ ॥
काया वाचा मनेंकरून । प्राप्त गंधाक्षत पुष्प घालून ॥
नित्य नेमें छवीचें पूजन । नैवेद्य समर्पण करीत ॥ १४८ ॥
सरेल केव्हां कर्मभोग । होईल केव्हां मनाजोग ॥
साई प्रत्यक्ष दर्शनयोग । आपास हृद्रोग लागला ॥ १४९ ॥
साईबाबांच्या छवीचें दर्शन । तेंही प्रत्यक्ष दर्शनासमान ॥
भाव मात्र असावा पूर्ण । वेळेवर खूण पावाल ॥ १५० ॥

---

१ या कथेस. २ अगाध.

केवळ छबीचें दर्शन होतां । प्रत्यक्ष दर्शनाची त्या समता ॥
ये विषयींची अन्वर्थता । श्रोतां सादरता परिसीजे ॥ १५१ ॥
एकदां बाळाबुवा सुतार । मुंबापुरस्थ भजनकार ॥
अर्वाचिन तुकारामनामधर । गेले शिर्डीस दर्शना ॥ १५२ ॥
हीच तयांची प्रथम भेट । पूर्वीं कधींही नसतां गांठ ॥
होतांच उभयतां दृष्टादृष्ट । साई तों स्पष्ट त्या वदले ॥ १५३ ॥
चार वर्षांपासून पाहे । मजला याची ओळख आहे ॥
बाळाबुवा विस्मित होये । ऐसें कां हे वदतात ॥ १५४ ॥
बाबांनीं नाहीं शिरडी सोडिली । मीही डोळां आजची देखिली ॥
त्या मज चारवर्षांपहिली । ओळख पडली हें कैसें ॥ १५५ ॥
ऐसा विचार करितां करितां । चारचि वर्षांमागील वार्ता ॥
छबी एकदां बाबांची नमितां । आठवली चित्ता बुवांच्या ॥ १५६ ॥
मग त्या बोलाची अन्वर्थता । बाळाबुवांस पटली तत्वता ॥
म्हणती पहा संतांची व्यापकता । भक्तवत्सलता ही त्यांची ॥१५७॥
मी तो केवळ छबी नमिली । प्रत्यक्ष मूर्ति आजची पाहिली ॥
बाबांनीं परी ओळख धरिली । मी ती हरविली कधींच ॥ १५८ ॥
हरविली म्हणणें हेंही न सार्थ । कीं तात्काळ कळेना बोलाचा अर्थ ॥
छबी नमनीं ओळख हा पदार्थ । जाणाया समर्थ नव्हतों मी ॥ १५९ ॥
माझी ओळख बाबांस ठावी । माझ्या ही तों नव्हती गांवीं ॥
संतांनीं जें आठवण द्यावी । तेव्हांच पडावी ठायीं ती ॥ १६० ॥
निर्मळ आरसा निर्मळ उदक । तें बिंबाचें प्रतिबिंब देख ॥
छबी हेंही प्रतिबिंब एक । शुद्ध प्रतीक बिंबाचें ॥ १६१ ॥
म्हणून संतांच्या छबीचें दर्शन । आहे प्रत्यक्ष दर्शनासमान ॥
सर्वदर्शी संतांचीं जाण । तीच ही शिकवण सर्वांतें ॥ १६२ ॥
असो आतां पूर्वील कथा । परिसावया सावधानता ॥
असावी श्रोतयांचे चित्तां । अनुसंधानता राखावी ॥ १६३ ॥

वास्तव्य आप्पांचें ठाणें शहरीं । आली भिवंडीची कामगिरी ।
आठां दिवसां येईन माघारीं । पडले बाहेरी सांगून ॥ १६४ ॥
दिवस दोनची गेलियावरी । घडलें अपूर्व पहा माघारीं ॥
पातला एक फकीर द्वारीं । तयांचे घरीं ठाण्यास ॥ १६५ ॥
होतां तयाची दृष्टादृष्ट । साईच सर्वांस वाटले स्पष्ट ॥
छबीचें साम्य नखशिखांत । रूपरेखेंत संपूर्ण ॥ १६६ ॥
कुटुंब आणि मुलें बाळें । फकीराकडे सर्वांचे डोळे ॥
विस्मयापन्न जाहले सगळे । बाबाच आले वाटलें ॥ १६७ ॥
पूर्वीं न कोणास प्रत्यक्ष दर्शन । परी छबीच्या सादृश्यावरून ॥
हेच ते बाबा ऐसें जाणून । जिज्ञासासंपन्न जाहले ॥ १६८ ॥
साई शिरडीचे तेच कीं आपण । अवघीं फकीरास केला प्रश्न ॥
तयां तो फकीर करी जें निवेदन । श्रोतीं सावधान परिसिजे ॥१६९॥
साई स्वयें मी नव्हे साचा । परी मी बंदा आज्ञांकित त्यांचा ॥
समाचारार्थ मुलाबाळांच्या । आलोंसें तयांच्या आज्ञेनें ॥ १७० ॥
पुढें तो मागूं लागतां दक्षिणा । मुलांची माता करी संभावना ॥
एक रुपया देई तत्क्षणा । उदी प्रदाना तोही करी ॥ १७१ ॥
देई साईबाबांची विभूती । पुडींत बांधून बाईप्रती ॥
म्हणे ठेवी त्या छबीचे संगती । सौख्य प्राप्ती होईल ॥ १७२ ॥
ऐसा संपादूनि निजकार्यार्थ । साई असेल मार्ग लक्षित ॥
ऐसें म्हणून निरोप घेत । जाहला मार्गस्थ फकीर ॥ १७३ ॥
मग तो तेथूनियां जो निघाला । आलिया मार्गें चालून गेला ॥
येरीकडे जो वृत्तांत घडला । अपूर्व लीला साईची ॥ १७४ ॥
आप्पासाहेब भिवंडीस गेले । पुढें न जातां मागें परतले ।
घोडे टांग्याचे अजारी झाले । गमन राहिलें पुढारा ॥ १७५ ॥
ते मग दुपारीं ठाण्यास आले । वृत्त सर्व झालेलें कळलें ॥
आप्पासाहेब मनीं चुरचुरले । कीं ते अंतरले दर्शना ॥ १७६ ॥

अवघी रुपयाच दक्षिणा दिधली । तेणें मनाला लज्जा वाटली ॥
मी असतों तर दहाचे खालीं । नसतीच झाली बोळवणी ॥ १७७ ॥
ऐसें आप्पासाहेब वदले । चित्तास किंचित खिन्नत्व वाटलें ॥
फकीर मशीदींत सांपडतील वाटलें । शोधार्थ निघाले उपवासी १७८
मशीद तकिया ठिकठिकाणीं । जेथें जेथें उतरती कोणी ॥
स्थानें समस्त शोधिलीं आप्पानीं । फकीरालागूनि तेधवां ॥ १७९ ॥
शोधाशोध करितां थकले । फकीर कोठेंही तो नाढळे ॥
मग ते भुकेले जाऊन जेवले । निराश झाले तेधवां ॥ १८० ॥
परी तयांस नाहीं ठावें । रित्या पोटीं न शोधा निघावें ॥
आधीं निजात्म्यास संतुष्टवावें । पाठीं उठावें शोधार्थ ॥ १८१ ॥
ये अर्थाची बाबांचीच कथा । दावील या निज तत्वाची यथार्थता ॥
किमर्थ येथें तिची द्विरुक्तता । अध्याय तो श्रोतां अवगत ॥ १८२ ॥
गुरु गरिमा नामें एक । गताध्यायीं कथा सुरेख ॥
तेथ स्वमुखें निज गुरुची भाक । वर्णिली कारुणिक श्रीसाईनीं ॥१८३
तेंच सत्य अनुभवा आलें । आप्पा जेव्हां जेऊन निघाले ॥
सवें स्नेही चित्रे घेतले । सहज चालले फिरावया ॥ १८४ ॥
असो, कांहीं मार्ग क्रमितां । अनुलक्षून आपणाकरितां ॥
देखिलें येतां एका गृहस्था । अति सत्वरता ते स्थळीं ॥ १८५ ॥
येऊनि उभे राहतां जवळी । आप्पासाहेब हळूच न्यहाळी ॥
हेच आले असतील सकाळीं । वाटलें ते वेळीं तयांस ॥ १८६ ॥
आधीं जयातें शोधीत होतों । हाचि गमे मज फकीर कीं तो ॥
आनखाग्र छबीसीं जुळतो । विस्मय होतो बुद्धीसी ॥ १८७ ॥
ऐसें आप्पा तर्कितो अंतरीं । तोंच तो फकीर हात पसरी ॥
ठेवी एक रुपया करीं । आप्पा ते अवसरीं तयाचे ॥ १८८ ॥
आणीक मागतां आणीक एक । दिधला तयावरी तिसरा देख ॥
तरीं तो फकीर मागे आणीक । नवल कौतुक पुढेंच ॥ १८९ ॥

शिम्यांपाशीं[1] होते तीन । तेही आप्पा घेती मागून ॥
देती तया फकीरालागून । तरी तो राही न मागतां ॥ १९० ॥
आप्पासाहेब वदती तयास । आणिक देईन येतां घरास ॥
बरें म्हणून घराकडेस । तिघे ते समयास परतले ॥ १९१ ॥
घरीं येतांच आणिक तीन । हातीं दिधले रुपये काढून ॥
झाले नऊ तरी अजून । फकीर समाधान पावेना ॥ १९२ ॥
पुढें अधिक दक्षणा मागतां । आप्पासाहेब वदती तत्वतां ॥
बंदी दहाची नोटची आतां । बाकी रहातां राहिली ॥ १९३ ॥
सुटे रुपये सर्व सरले । नाहीं दुसरे कांहीं उरलें ॥
नोट देईसना फकीर बोले । तैसेंही केलें आप्पानीं ॥ १९४ ॥
नोट जंव ती हातीं लागे । नऊ देऊनि टाकी मागें ॥
फकीर मग तो आलिया मार्गें । गेला अतिवेगें परतोनी ॥ १९५ ॥
पाहतां या कथेचें सार । जया भक्ताचे जैसे उद्गार ॥
तैसे ते पूर्ण करवून घेणार । ब्रीद हें साचार साईचें ॥ १९६ ॥
पाहूनि श्रोत्यांची श्रवणोत्सुकता । येच अर्थींची आणिक वार्ता ॥
स्मरली जी मज प्रसंगोपात्तता । अति सादरता परिसावी ॥ १९७ ॥
आहेत एक भक्त भाविक । नामें हरीभाऊ कर्णीक ॥
डहाणू ग्रामीचे स्थाईक । अनन्यपाईक साईचे ॥ १९८ ॥
सन एकोणीसशें सतरा । पाहोनि गुरुपौर्णिमा पवित्रा ॥
करूं आले शिरडीची यात्रा । त्या अल्प चरित्रा सांगतों ॥ १९९ ॥
यथाविधी पूजा झाली । दक्षिणा वस्त्रें अर्पण केलीं ॥
आज्ञा घेऊनि उतरतां खालीं । कल्पना आली मनास ॥ २०० ॥
वाटलें आणीक एक रुपया । वरती जाऊन बाबांस द्यावा ॥
तोंच तो विचार लागला त्यागावा । रुपया ठेवावा तैसाच ॥ २०१ ॥
ज्या गृहस्थें आज्ञा देवविली । त्यानेंच दरून खूण केली ॥
आतां एकदां आज्ञा झाली । पुढील पाउलीं मार्गक्रमा ॥ २०२ ॥

१ माधवराव देशपांडे.

विश्वास ठेवूनियां संकेतीं । कर्णीक तैसेच पुढें निघती ॥
उतरते झाले नाशिकावरती । मित्रसमवेती मार्गांत ॥ २०३ ॥
काळ्या रामाचे देउळांत । कर्णीक जातां दर्शनार्थ ॥
नरसिंग महाराज संत । दर्शन अवचित जाहलें ॥ २०४ ॥
भक्तपरिवार असतां भोंवतीं । महाराज अकस्मात उठती ॥
कर्णिकांस मणिबंधीं धरिती । रुपया म्हणती दे माझा ॥ २०५ ॥
कर्णिक मनीं जाहले विस्मित । रुपया मोठ्या आनंदें देत ॥
कैसा साईही मनोद्दत्त । रुपया स्वीकारित वाटलें ॥ २०६ ॥
साई स्वीकारित हेंही न साच । ध्यानीं मनींही नसतां तसाच ॥
खेंचून बलात्कारें ते मागत । तैसीच ही मात जाहली ॥ २०७ ॥
मन हें संकल्प विकल्पात्मक । तरंगावर तरंग अनेक ॥
सकृद्दर्शनीं भावी एक । प्रसंगीं आणिक कल्पना ॥ २०८ ॥
आरंभीं चित्तीं उठे जो लहरी । मात्र ती सद्वृत्ती असावी बरी ॥
होईल तियेचाच परिपोष जरी । कल्याणकारी ती एक ॥ २०९ ॥
तियेचेंच अनुसंधान । दृढाभ्यसन निदिध्यसन ॥
होऊं न द्यावें मना विस्मरण । राखावें वचन प्रयत्नें ॥ २१० ॥
आप्पासाहेब बोलून गेले । पुढें मागें असते विसरले ॥
बोल उठतांच पुरवून घेतले । नवल दर्शविलें भक्तीचें ॥ २११ ॥
नाहीं तरी त्या फकीरापाशीं । नोटी समवेत एकोनविंशी[1] ॥
असतां नऊच कां दिधले आप्पाशीं । होती असोसीं दहाचीच ॥ २१२ ॥
जयास बाबांचा लागला कर । तो हा नऊ पुतळ्यांचा हार ॥
नवविध भक्ति प्रेम निकर । स्मरण प्रकार बाबांचा ॥ २१३ ॥
देह विसर्जन कथा ऐकतां । स्वयें बाबा निजदेह त्यागितां ॥
कळून येईल अभिनव दानता । नवदान[2] देतां ते समयीं ॥ २१४ ॥

१ एकूणीस. २ नऊ रुपयांचें दान, सौ० लक्ष्मीबाईला केलें तें.

दिधला काया वाचा मनें । एकचि रुपया कुटुंबानें ॥
स्वीकारिला अति संतुष्टपणें । अधिक मागणें नव्हतें तें ॥ २१५ ॥
परी तें निज कुटुंबाचें देणें । आप्पांचे मनास वाटलें उणें ॥
मी असतों तर देतों दशगुणें । फकीरा कारणें तेव्हांच ॥ २१६ ॥
ऐसें आप्पा जें वाचा दत्त । दहा रुपये देतों म्हणत ॥
ते संपूर्ण न देतां वचननिर्मुक्त । होतील ऋणमुक्त कैसे ते ॥ २१७ ॥
फकीर नव्हता हा इतरांपरी । हा काय कोणी होता भिकारी ॥
कांहीही पडतां जयाचे करीं । जाईल माघारी परतोन ॥ २१८ ॥
जाहले नव्हते दिवसगत । बोलल्याच दिशीं मागता येत ॥
परी ते कोणीही फकीर अपरिचित । म्हणून साशंकित आप्पा तैं ॥ २१९ ॥
आरंभीं मागणें करिते वेळीं । सहा रुपये होते जवळीं ॥
परी ती रक्कम हाता वेगळी । तदर्थ केली ना त्यांनीं ॥ २२० ॥
असो आप्पांवरी प्रेम नसतें । फकीर वेषें बाबा कां येते ॥
जरीं दक्षिणेचें मीष न करिते । कथेस येते रस कैंचें ॥ २२१ ॥
आप्पासाहेब केवळ निमित्त । तुम्हा आम्हा एकच गत ॥
जरी आरंभीं गोड हेत । प्रसंगीं आचरित प्रसंगासम ॥ २२२ ॥
आपण सर्व वाग्दानीं तत्पर । दान काळीं शंका फार ॥
जीव होई खालींवर । निश्चितता तर दुर्लभ ॥ २२३ ॥
तथापि हित आणि मित बोलेल । बोला ऐसेंच जो वागेल ॥
खरें करून दावी निज बोल । एकादाच लाल हरीचा ॥ २२४ ॥
असो जो भक्त अनन्यभावीक । जो जो जे जे अर्थी कामुक ॥
असो ऐहिक वा आमुष्मिक । साई फलदायक समर्थ ॥ २२५ ॥
जरी हे आप्पासाहेब हुषार । आँग्लविद्या विभूषित चतुर ॥
आरंभीं चाळीस टिकल्याच पगार । देतसे सरकार तयांतें ॥ २२६ ॥
ते पुढें ही छवी लाधतां । हळू हळू वाढूं लागतां ॥
चाळिसांच्या बहु गुणें वरता । पगार आतां झालासे ॥ २२७ ॥

एकाचिया दशगुणें देतां। दशगुणें अधिकार दशगुणें सत्ता ॥
हातो अनुभव हातो हाता । सकळां देखतां बाबांचा ॥२२८॥
शिवाय परमार्थाची दृष्टी । वाढीस लागे निष्ठेच्या पोटीं ॥
ही काय आहे सामान्य गोठी । विचित्र हातोटी बाबांची ॥ २२९ ॥
पुढें आप्पासाहेब मागती । फकीरानें दिलेली विभूती ॥
पाहूं जातां ती पुडी होती । प्रेमें पाहती उघडून ॥ २३० ॥
उदी समवेत पुष्पें अक्षता । पुडी माजी निघालीं तत्त्वता ॥
ताईत बनवून अतिपूज्यता । बांधिली निजहस्ता माझारी ॥ २३१ ॥
पुढें बाबांचें दर्शन घेतां । स्वयें बाबांनी जो दिधला होता ॥
तो केसही अति प्रेमळता । घातला ताइता माझारी ॥ २३२ ॥
काय बाबांच्या उदीचें महिमान । उदी शंकराचेंही भूषण ॥
भावें भाळीं करीजो चर्चन । विघ्न निरसन तात्काळ ॥ २३३ ॥
करूनि मुखमार्जन स्नान । करी जो नित्य उदी विलेपन ॥
चरण तीर्थ समवेत पान । पुण्य पावन होईल तो ॥ २३४ ॥
शिवाय या उदीचा विशेष । सेवितां होईल पूर्णायुष ॥
होईल पातक निरसन अशेष । सुख संतोष सर्वदा ॥ २३५ ॥
ऐसें या गोड कथामृताचें पारणें । साईनें केलें आप्पांकारणें ॥
तेथ आपण आगांतुक पाहुणें । यथेष्ट जेवणें पंक्तीस ॥ २३६ ॥

---

या उदीचे महत्त्वाचा आणखी एक दाखला रा. रा. हरि सीताराम दीक्षित यांहीं टिपून ठेवलेला आहे त्याचा उतारा:—

'पार्ल्यास पंज.ब्याच्या चाळींत खिमजी लालजी जोशी या नांवाचे गृहस्थ रहात होते. त्यांची मुलगी बरेच दिवस आजारी होती. एके दिवशीं ती अत्यावस्थ झाली. तेव्हां तिची आई आमच्या घरीं येऊन महाराजांची उदी घेऊन गेली. त्या उदीनें तिला तांबडतोब थोडा गुण आला. पुढें खिमजी मुलीला व बायकोला घेऊन शिरडीस गेले. मुलगी इतकी अशक्त होती कीं तिला चालवत नव्हतें. हातापायाच्या अगदीं काडया झालेल्या होत्या.

पाहुणे अथवा घरधनी । उभयांसि एकचि पैजवानी ॥
प्रपंच नाहीं रसास्वादनीं । स्वानंद भोजनीं व्हा तृप्त ॥ २३७ ॥
हेमाड साई चरणीं शरण । पुरें आतां हें इतुकेंच श्रवण ॥
पुढील अध्यायीं होईल कथन । याहून महिमान उदीचें ॥ २३८ ॥
उदी चर्चन साई दर्शन । हाडव्यात्रण निर्मूल निरसन ॥
नारू निवारण ग्रंथिज्वर हरण । अवधान पूर्ण परिसावें ॥ २३९ ॥

स्वस्ति श्री संत सज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थसच्चरिते । उदीप्रभावो नाम
त्रयस्त्रिंशत्तमोऽध्यायः संपूर्णः ॥

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु । शुभंभवतु ॥

---

तिला एका माणसानें उचलून महाराजांजवळ नेऊन बसविलें महाराजानें तिला उदी लावली व आशीर्वाद दिला. दोन चार दिवसांत ती आपल्या पायानें चालूं लागली. मात्र उठतां बसतां तिला त्रास होत असे. मग तिनें महाराजांकडे त्याबद्दल गाऱ्हाणें केलें. महाराजांनीं तिला एक फळ खावयास दिलें. व तेव्हांपासून उठण्या बसण्याची अडचणही दूर झाली.

माझे एक मित्र एक दिवस माझे ऑफिसांत आले व म्हणूं लागले, "आज आठ दिवस मला झोंप येत नाहीं. डाक्टरांचें औषध घेत असतों पण कांहीं उपयोग होत नाहीं." मी त्यांना महाराजांची उदी दिली व ती तीन दिवस घेण्यास सांगितली. दुसरेच दिवशीं ते माझे ऑफिसांत आले व म्हणूं लागले "काल रात्रीं मी उदी घेतली व मला रात्रभर फार उत्तम झोंप लागली."

तसेंच वांद्रे येथे राहाणाऱ्या माझ्या एका स्नेह्याच्या मुलाला दोन महिने झोंप येत नव्हती. त्याच्या बापानें शिर्डीस महाराजांचे दर्शनास नेलें. त्याच रात्रीं त्याला झोंप आली व तेव्हांपासून रोज रात्रीं झोंप येऊं लागली.

सालमजकुरीं श्री साईबाबांच्या पुण्यतिथि निमित्तें शिर्डी येथील कार्यक्रम खालील प्रमाणें ठरला आहे.

अश्विन शुद्ध १० रविवार ता. २७ सप्टेंबर १९२५

| | |
|---|---|
| रुद्राभिषेक<br>भिक्षा<br>कीर्तन | सकाळी |
| आरती<br>आराधन विधि<br>भंडारा | दुपारीं |
| रथाची मिरवणूक | रात्रीं |

अश्विन शुद्ध ११ सोमवार ता. २८ सप्टेंबर १९२५

सायंकाळीं कीर्तन

रात्रीं चावडी

आश्विन शुद्ध १२ मंगळवार ता. २९ सप्टेंबर १९२५

सकाळीं काला नंतर आरती

सदर्हू कार्यासाठीं कोणास कांहीं पाठवावयाचें असल्यास तें रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोळकर ५ सेंट मार्टिन्सरोड,वांद्रें बी. बी. सी. आय. रेल्वे या पत्यावर पाठवावें.


## आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवी दासगणू महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किंमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फीसह ३॥ रु.

ग. अ. सराफ, नदेड.